# गोमंतकीय मराठी प्रयोगिक रंगभूमीचा वारसा जपणारे 'हंस थिएटर'

**(Gomantakiy Marathi Prayogik Rangbhumicha Varsa Japnare 'Hans Theater')**

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


अभ्यासक

वेदिका प्रशांत बेहरे

हजेरी क्र. 22P0190004

ABC ID 634363024343

पी. आर 201707084

मार्गदर्शक

**प्रा. विनायक बापट**

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# GOMANTAKIY MARATHI RANGBHUMICHA VARSA JAPNARE 'HANS THEATER'

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**
**MA in Marathi**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature
**Goa University**

by


**Vedika Prashant Behare**
Seat No: 22P0190004
ABC ID: 634363024343
PRA: 201707084


Under the supervision of


Prof. Vinayak Bapat
(Assistant Professor)
**Marathi Discipline**
Shenoi Goembab School of Language & Literature


**Goa University**
**2023 – 2024**

# DECLARATION BY STUDENT

I hearby declare that the data presented in this Dissertation report entitled, गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणारे 'हंस थिएटर' is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of prof. Vinayak Bapat and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

वेदिका प्र. बहरे

Vedika P. Behare

Signature and Name of Student

# COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report “गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणारे ‘हंस थिएटर’ is a bonafide work carried out by Miss. Vedika Prashant Behare under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of Master of Arts in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

VINAYAK L. BAPAT

Signature and Name of Supervising Teacher

Date: 16/4/2024

Signature of Dean of the School

Dept Stamp

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

Date: 16/4/2024

Place: Goa University

# मनोगत

एम.ए. भाग एकच्या वर्गात प्रवेश घेतला त्यावेळी कळलं की एम. ए ही पदवी प्राप्त करण्यासाठी संशोधन प्रबंधिका करणे गरजेचे आहे. आणि संशोधन प्रबंधिका या विषयां संदर्भात ज्यावेळी समजलं त्या क्षणापासून अनेक विचार आणि भिती मनात होती. संशोधन कसं करायचं, कोणते विषय निवडायचे, माझं वेळेवर संशोधन पूर्ण होणार की नाही? इत्यादी इत्यादी अनेक प्रश्नांची मोठी आणि न संपणारी अशी रांगच होती.

संशोधना विषयी विचार करत असतांना इतकं मात्र पक्क ठरलेलं की सागळ्यांपेक्षा नवीन काहीतरी करायचं आहे. विषय निवडीसाठी मी अनेक लोकांकडे बोलले. अनेकांनी मला विविध विषय सूचवले त्यात भाषाविज्ञानाचे काही विषय होते, मराठी गजलांचा अभ्यास, विशिष्ट कथाकाराच्या कथांचा अभ्यास अथवा नाटक  असे अनेक विषय मला सूचवले गेले.

संशोधन संदर्भात विद्यापीठातील गुरुजनांकडे बोलले, तसेच सतत माझ्यासोबत असणाऱ्या पूनम आणि सायली  या दोन मैत्रीणींकडे बोलून घेतलं. त्यांनी काही विषय सूचवले आणि मला स्पष्टपणे सांगितले "ज्यात तूला आवड आहे त्यांच अनुशंगाने विषयाची निवड कर".

त्यानंतर मी  एक दिवस प्राध्यापक  हेमंत अय्या यांच्याकडे गेली आणि त्यांच्याकडे  विषय निवडी संदर्भात बोलता बोलता त्यांनी  मला एक विषय सूचवला आणि तोच विषय मी पक्का केला. आणि त्या विषयाला  गोमंतकीय मराठी प्रयोगिक रंगभूमीचा वारसा जपणारे 'हंस थिएटर' असे शीर्षक देण्यात आले. विषय निवडीसाठी सतत मार्गदर्शन केल्या बद्दल मी प्रा. डॉ. हेमंत अय्या यांची मी मनस्वी आभारी आहे.

गोव्यातील हंस थिएटर या संस्थेचे सर्वेसर्वा नाट्यकर्मी स्व.  विजयकुमार नाईक यांच्याकडे या संदर्भात बोलून घेतलं. त्यांनी एकाक्षणाचा विचार न करता मला संशोधन करण्यासाठीचा होकार दिला आणि काही उपलब्ध असलेल्या माहिती मला दिली. त्यामुळे विजयकुमार नाईक यांचे विशेष आभार व्यक्त करते.

संशोधन प्रबंधिकेचे माझे मार्गदर्शक आणि मराठी अध्ययन शाखेचे विभाग प्रमुख प्रा. विनायक बापट यांनी सातत्याने विषयां संदर्भात उत्तम मार्गदर्शन केले. तेव्हा बापट सरांचे खुप खुप आभार मानते.

तसेच विभागातील डॉ. विनय मडगांवकर यांनी मला संशोधनासाठीच नव्हे तर ज्या-ज्यावेळी समस्या आल्या त्या त्यावेळी मनोबल दिलं आणि त्यांनी मला सतत जाणीव करून दिली की मी हे काम पूर्ण करू शकते. या मनोबलासाठी मनस्वी आभार व्यक्त करते. त्यांच बरोबर विभागातील इतर शिक्षकांचे व शिक्षकेतर विभागाचे  मी आभार व्यक्त करते.

संशोधनाच्या दरम्यान हंस संस्थेशी संबंधित व्यक्तिनी मला माहिती  मिळविण्यासाठी मदत केली. संशोधनाच्या दरम्यान अनेक समस्या आल्या त्यावेळी मला फोंडयातील मंदार जोग आणि पेडण्यातील प्रणेश गुरव यांनी पदोपदी मदत केली. विविध उपक्रमांच्या संदर्भात माहिती, तसेच पुस्तकंव संदर्भ शोधण्यासाठी त्यांनी मला खुप मदत केली. मुळात त्यांनी मला प्रोत्साहन देखील दिलं. त्यासाठी तुम्हा दोघांची मी  ऋणी आहे. वृशांक कानेकर, लौकिक देसाई, यांचेही मी आभार व्यक्त करते.

या प्रबंधिकेच्या दरम्यान अनेक ज्ञात व्यक्तिकडे संवाद झाला. त्यातून अनेक माहिती मिळाली. अनेकांनी आपले अनुभव सांगितले. त्यातून अनेक विषय समजले. हंस थिएटर या संस्थेविषयीचे जे काही थोडं फार संचित त्यांच्याकडे आहे ते माझ्या पर्यंत पोहचवल्या बद्दल मी मनस्वी आभार व्यक्त करते.

माझ्या प्रबंधिकेच्या सुरुवातीपासून ते शेवट पर्यंत माझ्या समस्त बेहरे कुटुंबाने मला साथ दिलेली आहे. संपूर्ण बेहरे कुटुंबाचे आभार मानावे तितके कमीच आहे. आई- वडीलांच्या आशीर्वादामुळे आणि पाठिंब्यामुळे हे संशोधन सद्य स्थितीत पूर्ण आहे. तसेच संपूर्ण मित्र परिवार जो नेहमी प्रत्यक्ष- अप्रत्यक्षपणे माझ्या बरोबर असणारा आणि ज्यांनी मला संशोधन करण्यास मदत केली त्यांचे मी आभार मानते.

संपूर्ण 'हंस थिएटर' परिवाराचे आणि स्व. विजयकुमार नाईक यांच्या समस्त कुटुंबियांचे  मी मनापासून आभार मानते.  कौस्तुभ नाईक पुढील शिक्षणासाठी परदेशात असला तरी सतत संवाद ठेवून मला मदत केली आणि आनंदाने माहिती माझ्यापर्यंत पोहचवली तेव्हा त्याचीही मी मनस्वी ऋणी आहे.

शेवटी कोणतेही काम फळाला नेताना गुरुंची  तसेच देवदेवतांची साथ असेल तरच  ते काम निर्विघ्नपणे पार पडते. मी माझ्या कुलदैवतांच्या आणि रंगदेवतेच्या  चरणी वंदन करून आणि त्यांचे स्मरण करून ही संशोधन पर प्रबंधिका गोवा विद्यापीठच्या मराठी अध्ययन शाखेला सुपूर्त करत आहे. पुढे भविष्यात या विषयी आणखी सखोल संशोधन आणि लेखनाची इच्छा मनात बाळगत आहे.

# अनुक्रमणिका


| अनु.क्रम. | प्रकरणांची नावे | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रकरण १. गोमंतकातील मराठी नाट्य परंपरा आणि प्रायोगिक रंगभूमीचा वारसा. | ५ -१८ |
| २. | प्रकरण २. 'हंस थिएटर' च्या स्थापनेची पार्श्वभूमी. | १९ – ३३ |
| ३. | प्रकरण ३. 'हंस थिएटर' चे नाट्य विषयक उपक्रमांचे विश्लेषण. | ३४- ४१ |
| ४. | प्रकरण ४. 'हंस थिएटर'ने साकारलेल्या नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास. | ४२ – ५३ |
| ५. | प्रकरण ५. समारोप आणि निष्कर्ष | ५४ – ६५ |
| ६. | संदर्भ सूची | ६६ |
| ७. | परिशिष्ट | ६७ -८५ |

# प्रस्तावना

गोमंतकीय समाज हा कलाप्रेमी समाज आहे. त्यामुळे गोमंतकीय नाट्यकलेला फार जूनी परंपरा लाभलेली आहे. गोमंतकीय मराठी नाट्य रंगभूमीची परंपरा लक्षात घेता नाट्य वाङ्ग्मयाच्या क्षेत्रात गोमंतभूमी समृद्ध आहे या बद्दल प्रचिती येते.

गोमंतक हा विविध रुढि, परंपरा, संस्कृती जोपसून ठेवणारे असे हे प्रसिद्ध राज्य आहे. देव-देवतांच्या देवळा-रावळाच्या या प्रदेशात आपल्याला असंख्य कलाप्रकार जोपासून ठेवलेले दिसून येतात. उदा. पारंपरिक नृत्य कला, शिगमा, धालो, तालगडी इत्यादीं बरोबरच आपल्याला नाटका संबंधित प्रयोगक्षम कला देखील जोपासून ठेवलेल्या दिसून येतात. लोकनाट्य, जागर, रणमाले, कळसूत्री बाहुल्यांच्या खेळ, किर्तन आदि प्रयोगक्षम गोमंतकीय मराठी लोकरंगभूमी गोवामुक्तीपूर्वी हौशी व उत्सवीरंगभूमीच्या माध्यमातून मोठ्या संख्येत सादर झालेली दिसून येत असे. या लोकरंगभूमीच्या माध्यमातून गोमंतकीय मराठी रंगभूमीची परंपरा वृद्धिंगत होतांना आपल्याला दिसून येते.

गोमंतकीय आद्यनाटककार संत कृष्णभट्ट बांदकर उत्सवानिमित्त व रामनवमी निमित्त गोमंतकात संगीतप्रधान नाटकांचे प्रयोग करत असत. संत कृष्णभट्ट बांदकर यांच्या 'अहिल्योद्धार' या संगीत प्रधान नाटकाने गोमंतकात नाट्यभूमीची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर आपल्याकडे अनेक नाटककार निर्माण झाले. अशी सुरु झालेली प्रदीर्घ गोमंतकीय मराठी रंगभूमी जपून ठेवण्याचे प्रयत्न विविध नाट्य संबंधित उपक्रमांच्या माध्यमातून गोमंतकीय नाट्य रसिकमंडळींनी अखंड चालू ठेवलेली आहे.

गोमंतकीय संस्कृतीतील नाट्यकला हा विषय गोमंतकीय जनतेचा जिव्हाळयाचा विषय होय. त्यामुळे गोमंतकातील मराठी रंगभूमीच्या परंपरेचे संवर्धन करण्यासाठी अनेक नाट्य संस्था पेडणे ते काणकोण पर्यंत प्रस्तापित झालेल्या आहेत. तसेच गोवा मुक्तीनंतर गोमंतकीय मराठी रंगभूमीला स्पर्धात्मक रंगभूमीचीही जोड मिळाल्याचे दिसून येते. गोमंतकात संस्थांच्या माध्यमातून राज्य स्तरीय स्पर्धा तसेच नाट्य विषयक विविध उपक्रम राबवून आजतागायत मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जोपासण्याचा प्रयत्न चालू आहे.

'गोमंतकातील प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणारे 'हंस थिएटर', या प्रबंधिकेच्या माध्यमातून गोमंतकातील अंत्रुजमहालात स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजेच १९५० साली स्थापना झालेल्या 'हंस थिएटर' या संस्थेच्या कार्याचा विवेचनात्मक परामर्श घेतला जाणार आहे.

## • संशोधन विषयक समस्या:

मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणाऱ्या गोमंतकातील 'हंस थिएटर' या संस्थेचा अभ्यास करून त्यांनी विकसित केलेल्या विविध नाटका संदर्भातील उपक्रमांची माहिती संग्रहीत करून भावी पीढ़ीला उपलब्ध करून देणे.

'हंस थिएटर' या संस्थेचा अभ्यास/परामर्श घेऊन त्यांनी राबवलेल्या विविध उपक्रमांची नोंद व्हावी आणि गोमंतकात अनेक नाट्य संस्था प्रस्तापित आहेत पण हंस थिएटर या संस्थेचं वैशिष्ट्य आणि वेगळेपणा लोकांना ज्ञात करून देण्यासाठी संशोधन करणे आवश्यक आहे. तसेच, 'हंस थिएटर' या संस्थेला प्रारंभ काळात मिळालेला लोकांचा प्रतिसाद आणि आज वर्तमान काळात मिळणारा प्रतिसाद या बद्दल तौलानिक दृष्टीने संशोधन करणे.

हंस थिएटर या संस्थेच्या माध्यमातून अनेक उत्कृष्ट अभिनेते व नामवंत कलाकार घडले. तसेच सोमनाथ नाईक, दिलीपकुमार नाईक, विष्णु सूर्या वाघ आणि विजयकुमार नाईक यांसारखे दर्जेदार व उल्लेखनीय नाटककार उदयाला आलेले आहेत. त्यांच्याही कार्याची ओळख समाजाला करून देणे आवश्यक आहे. गोवा आणि गोव्या बाहेरील नाट्य क्षेत्राशी संबंधित कार्य करणाऱ्या संस्थाच्या परिप्रेक्षात 'हंस थिएटर' चे स्थान जाणून घेण्याचा प्रयत्न करणे.

## • संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

मराठी प्रायोगिक रंगभूमीचे क्षेत्र व्यापक स्वरूपाचे आहे. भारतीय मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपून ठेवण्याचे प्रयत्न चालू आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासून विविध राज्यातील नाट्य संस्था तसेच नाट्य मंडळं मराठी प्रायोगिक रंगभूमीसाठी काम करत आहेत. त्याचप्रमाणे गोमंतकात देखील कित्येक अशा नाट्य संस्था आहेत ज्या गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमीला अजून व्यापक क्षेत्र बनवण्यासाठी नाटका संदर्भातील उपक्रम आयोजित करून रंगभूमी जतन करण्याचे काम करत आहेत. अशा संस्थांच्या कार्याची नोंद अथवा ओळख व्हावी यासाठी,

गोमंतकातील मराठी प्रायोगिक रंगभूमिचा वारसा जपणारे 'हंस थिएटर' असे शीर्षक दिलेल्या शोध प्रबंधिकेच्या अंतर्गत गोमंतकातील अंत्रुज महालात अनेक वर्षे प्रायोगिक रंगभूमीसाठी कार्यरत असणारी व गोमंतका बरोबर गोव्या बाहेर देखील प्रसिद्ध असणारी संस्था म्हणजेच 'हंस थिएटर'. स्वातंत्र्योत्तर काळापासून विविध वैशिष्टये जोपासत रंगभूमी गाजवणाऱ्या अशा एकाच संस्थेचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधिकेत केला जाणार आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टये**

- गोमंतकीय नाट्य परंपरेचा अभ्यास करणे.
- मराठी प्रायोगिक रंगभूमीच्या क्षेत्रात गोमंतकीय संत नाटककार कृष्णभट्ट बांदकर यांच्या योगदानाचा परिचय भावी संशोधकांना करून देणे.
- नाट्य प्रयोग सादरीकरणाच्या संदर्भात केलेल्या प्रयोगांचा परिचय करुन देणे.
- 'हंस थिएटर' या संस्थेने गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जोपासण्यासाठी केलेल्या कार्याची नोंद करून ठेवणे.

## ● गृहितकांची मांडणी

- गोमंतकीय मराठी रंगभूमीची परंपरा प्रदीर्घ आहे.
- 'हंस थिएटर' च्या सक्रियतेमूळे गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमीचा वारसा अखंडित राहिला.
- 'हंस थिएटर' या संस्थेमूळे प्रायोगिक रंगभूमीला सादरीकरणाचे विविध आयाम परिचित झाले.
- ' हंस थिएटर' संस्थेने नेहमीच नाविण्याचा वेध घेत प्रायोगिक नाट्य परंपरेची जोपासना केलेली आहे.
- गोमंतकातच नव्हे तर भारतीय रंगभूमीच्या क्षेत्रात 'हंस थिएटर' या संस्थेने स्वतःचे स्थान निर्माण केलेले आहे.
- 'हंस थिएटर' या संस्थेने दर्जेदार नाटककार तसेच उत्तम अभिनेते घडवलेले आहेत.

## • संशोधन पद्धती

गोमंतकातील मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणारे 'हंस थिएटर', या प्रबंधिकेमध्ये ऐतिहासिक पद्धती, तौलनिक पद्धती, वर्णनात्मक पद्धती व सर्वेक्षण संशोधन पद्धती इत्यादी संशोधन पद्धतींचा वापर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## • संशोधनाचा आराखडा

गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणारे 'हंस थिएटर' या विषयावर संशोधनपर प्रबंधिकालेखन करत असताना सदर विषयाची मांडणी खालीलप्रमाणे एकूण पाच प्रकरणाद्वारे केलेली आहे.

## • प्रकरणांची मांडणी:

प्र.१- गोमंतकातील मराठी नाटय परंपरा आणि प्रायोगिक रंगभूमीचा वारसा.

प्र.२- 'हंस थिएटरच्या' स्थापनेची पार्श्वभूमी.

प्र.३- 'हंस थिएटर' चे नाट्य विषयक उपक्रमांचे विश्लेषण.

प्र.४- 'हंस थिएटर' ने साकारलेल्या निवडक नाटकांचा विवेचनात्मक अभ्यास.

प्र. ५- उपसंहार आणि निष्कर्ष

परिशिष्ट

# प्रकरण.१- गोमंतकातील मराठी नाटय परंपरा आणि प्रायोगिक रंगभूमीचा वारसा.

## • १.१. प्रस्तावना

नाटक हा एक सगळयांच्या जिव्हाळयाचा विषय असून नाटक हा दृक्श्राव्य ललित साहित्यप्रकार आहे. नाटक या साहित्याप्रकाराने मराठी माणसाचे मन नेहमीच आपल्याकडे आकर्षून घेतलेले आहे. नाट्यप्रेम हे आपल्याकडे मराठी माणसाच्या मनाचे एक विशेष लक्षण आहे. त्यामुळेच बहुतेक आपल्या मराठी रंगभूमीला विशिष्ट आणि प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे.

खालील प्रकरणातून आपण नाटकाची उत्पत्ती, उगम व विकास आणि थोडक्यात स्वरूप त्याचबरोबर भारतीय मराठी नाटकाची वाटचाल बघून भारतीय परिप्रेक्ष्यात गोमंतकीय मराठी रंगभूमीचा वेगळेपणा लक्षात घेणार आहोत.

## • १.२.भारतीय नाट्योत्पत्ती:

भारतात विविध क्षेत्रांच्या संस्कृतीत वेगळेपणा लक्षात येत असला तरी भारतीय संस्कृतीचे मूळ बीज एकच आहे. पूर्वेकडून पश्चिमे पर्यंत तसेच उत्तरेकडून-दक्षिणे पर्यंत प्रदेशातील कोणत्याही भाषेचा, साहित्याचा, कलाप्रकाराचा, तत्वज्ञान, इत्यादींचा उगम वैदिक संस्कृतीत व संस्कृत भाषेतूनच झालेला दिसून येतो. आजच्या बदलत्या परिस्थितील अनुसरुन भारतीय संस्कृतीत भर पडलेली आहे त्यामुळे आपल्याला बदलते स्वरुप आढळते. आजच्या बदलत्या जीवनांमुळे भारतीय संस्कृतीत जरी बदलते रूप दिसत असले तरी स्त्रोत वंशिक विशिष्टयांच्या खुणा फारश्या बदललेल्या नाहीत. भारतीय नाट्य कलेचा विचार अथवा अभ्यास करत असतांना भारतातील विविध प्रदेशात नाटकाशी निगडीत असलेल्या विविध प्रकारात व त्याच बरोबर नाटक सादरीकरणाच्या स्वरुपात भिन्नता प्रामुख्याने

दिसून येते. भारतीय संस्कृतीत वेद, उपनिषद, इत्यादींचे विशेष असे स्थान आहे. वेद, उपनिषदां प्रमाणेच विविध कलांच्या बाबतीत नाट्यशास्त्र या प्राचीन ग्रंथाला ही विशेष असे स्थान दिलेले आहे. नाट्यशास्त्र या ग्रंथांत भारतीय कलांचा शास्त्रोक्त विचार विनिमय केलेला आहे.

नाट्यशास्त्राचा मूळ विषय नाट्य म्हणजेच नाटक हा आहे. नाट्यशास्त्र हा ग्रंथ प्राचीन काळात भरतमुनी यांनी रचलेला आहे. या ग्रंथात भरतमुनीनीं नाटक या विषयीचे एकूणच चौफेर अशी शात्रोक्त चर्चा केलेली आहे. ग्रंथात नाट्य विषयीच्या सविस्तर चर्चेला प्रारंभ होतो तो नाट्योत्पत्तीच्या कथेपासून. नाट्योत्पत्तीची कथा नाट्यशास्त्राच्या पहिल्या अध्यायातच वर्णन केलेली आहे. भारतीय नाट्यकलेचा उगम या विषयी जाणून घेताना अनेक पौराणिक कथांचा

संदर्भ पडताळून बघावा लागतो. नाट्यशास्त्राचे रचनाकार भरतमुनी यांनी आपल्या नाट्यशास्त्र या ग्रंथात नाट्यशास्त्राच्या उत्पत्तीविषयक जी माहिती सांगितलेली आहे ती रम्याद्भूत, देवसृष्टीशी संबंधीत असलेली एक दंतकथेच्या आशयाची आहे.

प्राचीन काळात पृथ्वीवर चार वेद - ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद अस्तित्वात होते. या चार वेदांतील विषय व ज्ञान हे विद्वान पंडित लोकच प्राप्त करू शकत होते. सर्वसमान्यांना चार वेद प्राप्त करून घेणे अथवा जाणून घेणे शक्य नव्हते. सर्वसमान्यांसाठी इतर कोणतेही मनोरंजनाचे साधन नव्हते. त्यामुळे हे लोक ब्रह्मदेवांकडे गेले व सर्वसमान्य लोकांसाठी त्यांच्या मनोरंजनासाठी काहीतरी निर्माण करण्याची विनंती ब्रह्मदेवांना केली. पृथ्वीवासियांच्या विनंतीचा स्वीकार करून ब्रह्मदेवांनी नाट्यवेदाची निर्मिती केली. नाट्यवेद निर्माण करण्यासाठी इतर चारवेदांची मदत घेतलेली आहे. या नाट्यवेदात भगवान ब्रह्मदेवांनी प्रत्येक वेदांमधून थोडा थोडा भाग घेतला व समग्र पाचवावेद तयार केला. ब्रह्मदेवांनी ऋग्वेदातून संहिता घेतली, सामवेदातून संगीत विषयक भाग घेतला, अभिनया विषयीचा भाग यजुर्वेदातून घेतला, व रस विषयक थोडा भाग अथर्ववेदातून घेतला व पृथ्वीवासियांसाठी पंचमवेद म्हणजेच नाट्यवेद निर्माण केला. या नाट्यवेदाचे उपयोजन कसे करावे या विषयीचे ज्ञान लोकांना समजणे गरजेचे होते. त्यामुळे ब्रह्मदेवांनी नाट्यवेद भरतमुनींना दिला व त्यावर सादरीकरण करण्यास सांगितले.

भरतमुनींनी आपले शंभर विद्यार्थी घेऊन नाट्यवेदावर आधारित अमृतमंथन व त्रिपूरदाह असे दोन नाटयप्रयोग निर्माण केले. त्यात कौशिकी वृत्तिची योजना व्हावी म्हणून ब्रह्मदेवांनी अप्सरा निर्माण केल्या. त्यानंतर नाटयप्रयोग कैलास पर्वतावर भगवान महादेवांच्या समोर सादर करण्यात आले. आशिर्वाचनपर नांदी व रंगदेवतेला

स्मरण व वंदन करून दोन्ही प्रयोग सादर केले. हे प्रयोग पाहून भगवान शंकर प्रसन्न झाले व या नाट्यप्रयोगात नृत्याची योजना करण्याचे सूचवले. भगवान शंकरांनी शिष्य तण्डू याला नृत्य शिकवले व तण्डू यांच्याकडून

भरतमुनींनी नृत्य शिकून घेतले त्यानंतर नाट्याच्या पूर्वरंगात नृत्याचे उपयोजन केले. अशा पद्धतीनेनाट्याची उत्पत्ती झाली व पहिला नाटयप्रयोग सादर केला.

नाट्य स्वर्गातून पृथ्वीतलावर कसे पोहचले या संदर्भातली कथा नाट्यशास्त्राच्या अगदी अंतिम दोन अध्यायात वर्णन केलेली आहे. ती कथा पुढील प्रमाणे आहे.

स्वर्गात ज्यावेळी नाट्य प्रयोग सादर केले त्यावेळी भरतमुनींच्यां विद्यार्थ्यांनीं ऋषींचा अपमान केला. संतप्त ऋषींणी त्यांना शाप दिला की तुम्ही पृथ्वीवर जन्म घ्याल व नाट्यवेदाचे ज्ञान नाश पावेल पण देवांनी विनंती करून उ:शाप मागितला. त्यावर नाट्यवेदाचे ज्ञान नाश न होऊ देता नाट्यवेदाचे ज्ञान अप्सरांना देण्यात आले व भरतमुनींचे शिष्य पृथ्वीवर येऊन नाट्य प्रयोग सादर करू लागले अशा पद्धतीने नाट्य पृथ्वीवर अवतरले. अशी कथा सांगितलेली आहे.

## • १.३.नाट्यसंज्ञा

नाट्य ह्या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृत भाषेतील 'नट' या धातूपासून झालेली आहे. नट या संस्कृत धातूचा अर्थ नाचणे, अभिनय करणे, असा आहे.( शब्दकोशातील अर्थ)

भरतमुनींनी नाट्याची व्याख्या "नाट्यम भावानुकीर्तनम्" अशी सरळ, सुटसुटीत व अर्थवत केलेली आहे. भरतमुनींनी केलेल्या व्याखेतील भाव या शब्दाचा अर्थ मानवी सुखदुःख, कल्पना, शंका, अनुभव असा दिलेला आहे. भरतमुनींच्या नाट्यशाश्त्राचा आधार घेऊन श्री. ना. बनहट्टी यांनी "मराठी नाट्यकला आणि नाट्यवाङमय' या आपल्या ग्रंथात "सुखदुःखानी युक्त असे जे लोकांचे जीवन, प्रकृतिवैशिष्ट्य आहे. ते आंगिक इत्यादी प्रकारच्या अभिनयांनी प्रदर्शित केले जाते. त्यास "नाट्य" असे नाव आहे.

ग्रीक काव्यशास्त्रकार ॲरिस्टॉटलच्या मते, "नाट्य हे जीवनानुकरण असते. (Imitation of action of life) म्हणजेच जीवनाकृतीचे अनुकरण होय.

ॲरिस्टॉटल व भरतमुनी यांच्या व्याखेत आपल्याला काही साम्यभेद दिसतात. नाट्याचे साहित्यरूप आणि प्रायोगिक रूप या दोहोंवर भारतमुनींचा भर असलेला दिसतो तर, ॲरिस्टॉटलचा भर केवळ काव्यात्मक स्वरूपावरच असलेला दिसून येतो.

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या चार वेदांच्या माध्यमातून पंचमवेद म्हणजेच नाट्यवेद उदयास आला. नाट्यवेद निर्माण कार्यासाठी पाठ्य, गान, अभिनय व रस या चार विशेष गोष्टी वरील चार वेदांतून घेतल्या ज्या अभिनयासाठी अत्यंत महत्वाच्या आहेत. हे आपण नाटकाच्या व्युत्पत्ती बद्दलच्या विवेचनात जाणून घेतले.

नाट्यवेदात आंगिक, वाचिक, सात्विक, आहार्य इत्यादी अभिनयाचे चार प्रकार सांगितलेले आहेत.

- आंगिक अभिनय : हात, पाय, डोळे, इत्यादी अंगानी म्हणजेच शारिरीक अवयवांनी करायचा अभिनय.
- वाचिक अभिनय : मुखावाटे, वाणीने म्हणजेच संभाषणातील शब्द उच्चारून केलेला अभिनय. संवादातील चढ-उतार, शब्द फेक, इत्यादी.
- सात्विक अभिनय : मनाच्या कोपऱ्यातील भाव, भावनांनी करावयाचा अभिनय.
- आहार्य अभिनय : वेशभूषा, वस्त्र व आभूषणे यांच्या मदतीने केलेला अभिनय.

नाट्यनिर्मितीसाठी वरील चार अभिनय प्रकार अतिशय महत्वाचे असतात. या चार अभिनयाच्या मदतीनेच कोणतेही पात्र अथवा सोंग साकारले जाऊ शकते.

## • १.४. नाटक : साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये

नाटक हा साहित्यप्रकार कथा, कविता, कादंबरी, या साहित्य प्रकारपेक्षा वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. या संदर्भात नाटक या साहित्यप्रकाराचा आढावा घेणे आवश्यक आहे.

प्रत्येक साहित्यप्रकाराच्या रचनेत कोणते ना कोणते वैशिष्ट्य दडलेले असतेच. संवाद आणि प्रयोगक्षमता ही नाटकाची बंधने आहेत. नाटकाला पूर्णत्व तेव्हाच प्राप्त होते ज्यावेळी ते रंगभूमीवर सादर होते. नाटकाला एक विशिष्ट असा आकृतीबंध असतो. नाटक हे कायम प्रयोगरूपाने सादर होत असते.  नाटक हा दृक्श्राव्य असा साहित्यप्रकार आहे. त्यामुळे नाटककार, नट आणि प्रेक्षक यांच्यात एकरूपता दिसून येते. कविता, कथा, कादंबरी, या इतर साहित्यप्रकारांचा आस्वाद घेणे हे नात्कपेक्षा वेगळे असते. नाटक हे रंगमंचावर प्रयोगरूपाने सादर होत असल्याने  कोणत्याही नाटकाचा आस्वाद एकाच वेळी अनेकजण घेऊ शकतात. नेहमी नाटक हे संवादातून साकारत असते.

नाटकात नट व संवाद या शिवाय इतर काही घटक असतात. पात्रे, कथानक/ कथावस्तू, वातावरण, हे प्रमुख घटक असले तरी दिग्दर्शक, संगीतकार,वेशभूषाकार, ध्वनी नियोजक, इत्यदी घटकांच्या मदतीने नाटक हे प्रेक्षकांसमोर उभे राहते. नाटकामध्ये समजतील प्रवृत्ती, विचार, यांचे प्रतिनिधित्व केलेलं असते. नाटका हा सृजनात्मक साहित्यप्रकार आहे.

नाटक हे नाटककेतर साहित्यप्रकारांपेक्षा वेगळे कसे आहे हे सांगण्यासाठी प्रा. मधुकर तोरडमल लिहितात, “लेखकाच्या मनात एखादा विषय,आशय, अनुभव, विचार, किंवा एखादे कथाबीज रुजत जाते. शेवटी इतके फोफावते की त्याचा अंतस्थ येत मनाला असह्य होवून लेखक लेखक लिखाणाच्या स्वरुपात या सगळयाचा निचरा करतो. लेखकाच्या स्वाभाविक कलानुसार ते लिखाण कथा, कविता, निबंध, कादंबरी, अथवा नाटक अशा स्वरुपात उदयास येते.  नाटक सोडून कोणत्याही साहित्यप्रकारात लेखन आविष्कारित झाले, तर त्याचा सर्वेसर्वा लेखक असतो. नाटकाच्या बाबतीत मात्र असे अजिबात घडत अन्ही. कारण केवळ लिखाण करून नाटक थांबत नसते. लिखित स्वरूपाचे प्रयोग रंगमंच्यावर उभे राहिल्यावरच त्या नाटकाच्या लिखित स्वरूपाला “नाटक” म्हणून संबोधले जाते आठव मान्यता प्राप्त होते. ज्याचा प्रयोग रंगमंच्यावर होऊ शकत नाही ते लिखाण “ नाटक “ या संज्ञेला पात्र ठरत नाही.”

नाटक हा प्रयोगक्षम कला प्रकार आहे. प्रयोगक्षम हे नाटकाचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

## • १.५. नाटक: साहित्यप्रकार

नाटकाचा जन्म वेदकाळात झाला असे आपल्याकडे मानले जाते. रामायण,महाभारत, वेद, पुराणे, इत्यादींच्या माध्यमातून ‘नाटक’ या साहित्यप्रकाराचा उल्लेख आढळतो.

भवभूती, कालिदास, भास, इत्यादी नाटककारांनी नाटकाची परंपरा वृद्धिंगत केली. इतर साहित्यप्रकारापेक्षा नाटक हा साहित्यप्रकार उशिराने म्हणजेच १९व्या शतकाच्या सुरुवातीला उदयास आलेले आहे. असे असले तरी नाटकाची मूळ बीजे मात्र लोकनाट्य, विधिनाट्य या लोकपरंपरेत आढळतात.  जागरण, गोंधळ, लळीते, कीर्तन, सोंगे-भारुडे यासारखी विधी आणि लोकनाट्ये, यक्षगान, दशावतारी नाटके, भागवतमेळा, तमाशा, अशी नाट्य परंपरा लोकांत प्रचलित होती. आणि यामध्येच  मराठी नाटकाचे मूळ दिसून येते. मराठी लोकरंगभूमी ही आपल्या

भारतीय मराठी रंगभूमीच्या उदयाला कारणीभूत ठरली व लोकरंगभूमीच्या बोट धरूनच भारतीय रंगभूमीचा उगम व विकास झालेला आहे.

भारतीय मराठी रंगभूमीचा विचार करत असतांना तंजावरच्या नाटकांचा विचार करणे आवश्यक आहे. तंजावर येथे अनेक नाटके तयार झाली.

मराठी रंगभूमीचा उदय १८४३ साली विष्णुदास भावे यांच्या 'सीतास्वयंवर' या नाटकाने झाला असे मानले जाते. या नाटकाचे स्वरूप हे पौराणिक होते. लोकसंस्कृतीतील नाट्य आविष्काराकडून प्रेरणा घेऊन मराठी रंगभूमीवर प्रथम पौराणिक नाटक आले. १८४३ पासून सुरु झालेल्या नाट्य परंपरेचे अंदाजे ढोबळपणे कालखंड सांगितलेले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

- १८४३ ते १८८०
- १८८० ते १९२०
- १९२० ते १९५०
- १९५० ते आजपर्यंत
- १८४३ ते १८८० कालखंड:

या कालखंडात संस्कृत भाषेतील व इंग्रजी भाषेतील नाटके भाषांतरीत होऊन रंगभूमीवर येऊ लागली. इ.स.१८४३ या साली विष्णुदास भावे यांच्या 'सीतास्वयंवर' या नाटकाचा सांगली येथे प्रथम प्रयोग झाला. 'सीतास्वयंवर' हे नाटक पौराणिक असून गद्य-पद्य मिश्रीत स्वरूपाचे असे आहे. कोणत्याही नाटकाला संहिता असते किंवा असू शकते, नाटकाचे पुस्तक रूप होऊ शकते या बद्दलची जाणीव या कालखंडात झालीव व नाटक पुस्तक रूपाने प्रकाशीत होऊ लागले. याच काळात पौराणिक नाटके चालू असतांनाच मराठीत एक नवीन नाट्य प्रकार जन्माला आला तो म्हणजे 'फार्स' होय. 'नारायण पेशवे यांचा मृत्यू' हे मराठी भाषेतील पहिले फार्स मानले जाते. इंग्रजी भाषेच्या प्रसार प्रचारामुळे नाटकांची अभिरुची वाढली व संस्कृत भाषेतील नाटके म्हणजेच कालिदासांचे 'शाकुंतल' हे नाटक मराठीत भाषांतरित झाले व या नाटकाची साहित्यरूपी मुद्रित संहिता रंगभूमीवर सादर झाली. विनायक जनार्धन कीर्तने यांचे १८६२ या साली 'थोरले माधवराव पेशवे' हे नाटक आले.

याच दरम्यान अनेक इंग्रजी नाटके देखील मराठीत आली. शेक्सपियरची नाटके मराठीत येऊन ती ग्रंथरूपाने प्रकाशीत होऊ लागली. आणि ग्रंथरूपाने प्रकाशित होणार्या नाटकांना ‘बुकीश नाटके’ असे म्हणायची प्रथा सुरु झाली.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी समाज्यातील लोकांना इंग्रजी भाषेचा इंग्रजी वाङ्मयाचा परिचय झाला. याच काळात इंग्रजी व संस्कृत नाटके भाषांतरित होऊ लागली. १८५१-१८५५ या दरम्यान पाहिले भाषांतरित नाटक प्रसिद्ध झाले. 'प्रबोधचंद्रोदय' हे नाटक मूळ संस्कृत भाषेतून मराठी भाषेत स. ब.अमलापूरकर, रावजी बापूजी शास्त्री बापट यांनी भाषांतरित केले होते. या काळात संस्कृत बरोबर इंग्रजी नाटके देखील भाषांतरीत होऊ लागली. परशुराम-पंततात्या गोडबोले यांनी अनेक संस्कृत नाटके मराठीत भाषांतरित केलेली आहेत. मृच्छकटिक, नागनंदा आदी नाटके मराठीत भाषांतरित केलेली आहे.

महादेवशास्त्री कोल्हटकरांनी १८३७ साली केलेले अथेल्लो उल्लेखनीय आहे.  या व्यतिरिक्त शेक्सपिअरकृत द मर्चंट ऑफ व्हेनिसचे - स्त्री-न्यायचातुर्य, ज्युलियस सीझरचे -विजयशिंग.  १८७९ मध्ये सिंबेलाइनचे तारा  इ. आहेत.  या कालखंडात ही जी भाषांतरित नाटके होती, त्यांना पुढे ‘बुकिश नाटके’ अशी संज्ञा प्राप्त होण्याचे कारण म्हणजे ह्या भाषांतरित नाटकांना योग्य प्रमाणात प्रयोगरूप लाभत नव्हते.  बहुधा ती नाटके ग्रंथरूपाने बंदिस्त होऊन राहात.  त्यांतल्या काहींनाच प्रयोगाचा योग आला.  भाषांतरकर्त्यांला आपण ज्या नाटकाचे भाषांतर करतो आहोत त्या नाटकाच्या किंवा भाषेच्या संदर्भातील रंगभूमीचा परिचय नव्हता.  ती नाटके प्राप्त परिस्थितीत आपल्याकडच्या रंगभूमीवर कशी होतील याचा नेमका अंदाज नव्हता, म्हणून ती नाटके प्रयोगदर्शनापासून बरीच दूर राहिली.  एका बाजूला विष्णुदास भावे यांच्या नाटकस्थानाचे प्रयोग मोठ्या प्रमाणात विविध गावी होत होते आणि त्याच वेळी बुकिश नाटकांची निर्मितीही होत होती.

सामाजिक सुधारणेच्या चळवळीने जोर धरला व याचे पडसाद हळू हळू नाटकात दिसू लागले. पौराणिक,ऐतिहासिक नाटकाबरोबर सामाजिक नाटके उदयास येऊ लागली. महादेव चितळे यांचे ‘मनोरमा’ हे पहिले सामाजिक नाटक होय.

आधुनिक मराठी रंगभूमीच्या उगम व उभारणीचे श्रेय अण्णासाहेब किर्लोस्करांना दिले जाते. मराठी नाट्यसाहित्याच्या संस्कृतीत किर्लोस्कारांचे बहुमोलाचे असे योगदान आहे. अण्णासाहेबांनी ‘संगीत सौभद्र’ या

सारखी नाटके लिहिली आणि त्यात यश देखील प्राप्त केले आहे. किर्लोस्करांनी नाट्यसंगीताला समाजात एका प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त करून दिलेली आहे.

- १८८० ते १९२० कालखंड :

भारतीय मराठी रंगभूमीसाठी १८८० ते १९२० हा कालखंड नाट्यकलेच्या विकासाचा कालखंड आहे. या काळात अनेक नाटककार उदयास आले. देवल, कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी इत्यादींनी नाट्यसृष्टीत विशेष असे योगदान दिलेले आहे. 'दुर्गा', 'शारदा', इत्यादी देवलांची नाटके आहेत. श्रीपादकृष्ण कोल्हटकर यांनी 'मूकनायक', 'वधूपरीक्षा', अशी प्रसिद्ध नाटके लिहिली. त्याचबरोबर खाडिलकरांनी 'सं. स्वयंवर', 'सं. मानापमान', 'कीचकवध', 'सवाई माधवरावाचा मृत्यू' अशी नाटके लिहिली. 'प्रेमसन्यास', 'भावबंधन', 'एकच प्याला', ही नाटके राम गणेश गडकरी यांची आहे. असे नाट्य लेखन करून त्यांनी जनमानसात लोकप्रियता प्राप्त केलीच त्याचबरोबर अलौकिक असे यश प्राप्त केले.

१८८० ते १९२० या कालखंडात अनेक नामवंत नाटककार व त्याचबरोबर नाटके निर्माण झाली. विविध विषय नाटकांच्या माध्यमातून समोर येऊ लागले. सामाजिक विषय, कल्पनाप्रधान इत्यादी विविध नाटके रंगमंच्यावर आली. १९०० ते १९२० हा काळ भरतीत मराठी रंगभूमीसाठीचा 'अंधारयुग' मानला जातो. याचे कारण म्हणजे या काळात नाट्यनिर्मिती अगदी थोड्याच प्रमाणात झाली.

- १९२० ते १९५० कालखंड :

हा कालखंड म्हणजे नाटकाच्या विकासाचा कालखंड होय. नाटकाची वाटचाल खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती याच काळात. नाटकाच्या आशय आणि तंत्रदृष्ट्या या काळातील नाटके अधिक दर्जेदार बनली. प्र.के. अत्रे, वरेरकर, विश्राम बेडेकर, रांगणेकर, न.चि. केळकर, विनायक दामोदर सावरकर, ना.सी. फडके इत्यादी नाटककारांनी नाट्यसृष्टीत भर घातली.

- १९५० आणि नंतरचा कालखंड :

स्वातंत्रोत्तर काळात नाटकांचा अधिक विस्तार झाला. स्वातंत्र्य प्राप्तीचे पडसाद नाट्य क्षेत्रात दिसू लागले. त्यातून अनेक विषय नाट्य निर्मितीसाठी पोषक ठरले.

१९५० नंतर पु.ल. देशपांडे, कानेटकर, शिरवाडकर, विजय तेंडूलकर, श्री.ना. पेंडसे, जयवंत दळवी, रत्नाकर मतकरी, महेश एलकुंचवार अशा प्रसिद्ध नाटककारांनी नाटकाच्या परंपरेत मोलाची भर घातली. या नाटककारांचा नाटकात विविधता आणण्यासाठी मोलाचा हातभार आहे.

याच दरम्यान आधुनिक भारतीय मराठी रंगभूमीचा विकास होत असतांना नाटकात विविध प्रवाह आले. त्यामध्ये सामाजिक नाटकांचा प्रवाह, कौटुंबिक नाटकांचा प्रवाह, फार्सिकल नाटकांचा प्रवाह, प्रायोगिक नाटकांचा प्रवाह, आदी असे प्रवाह नाट्यसृष्टीत आले.

आधुनिक कालखंडातील प्रायोगिक नाटकांचा प्रवाह हा महत्वाचा प्रवाह आहे. नाटककारांनी नाट्यलेखन करून प्रायोगिक नाटकांचा प्रवाह अतिशय यशस्वीपणाने हाताळला. नाट्यसाहित्याला नवीन वाट प्राप्त झाली. कारण याच काळात सरकारचे प्रोत्साहन मोठ्या प्रमाणात मिळू लागले. त्याचबरोबर विविध पातळीवरच्या नाट्यस्पर्धा आयोजित केल्या जाऊ लागल्या. त्यामुळे रंगमंच्यावर विविधतेने नटलेली नाटके रंगभूमीवर सादर होऊ लागली.

## • १.६. गोमंतकीय नाट्यपरंपरा

तिसवाडी तालुक्यातील डोंगरी गावचे कृष्णंभट्ट बांदकर यांनी गोव्यातील मराठी रंगभूमीचा पाया घातला. कृष्णंभट्ट बांदकर यांनी ‘काला’ हा नाट्यप्रकार  गोव्यात व गोव्याबाहेर प्रसिद्ध केला. याच नाट्यप्रकारातून गोव्यात व गोव्याबाहेर मराठी नाटकांची सुरुवात झालेली दिसून येते. गोमन्तकाचे आद्य नाटककार व नाट्यकर्मी म्हणून त्यांनाच संबोधले जाते. कृष्णंभट्ट बांदकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात किर्लोस्कर यांच्यासारखे नामवंत नाटकार उदयास आले.

कृष्णभट्ट बांदकर हे गोमंतकातील विख्यात कीर्तनकार व् आद्य नाटककार होय. उत्तम कीर्तनीबाज असलेले नाट्य लेखन ते करीत असत. डोंगरी गावातील राममंदिरात रामनवमी निमित्त त्यांनी नाटके लिहिली व सादर केली. 'शुकरंभा संवाद', नट सुभद्राविलास', 'लोपामुद्रा संवाद', आणि 'अहिल्योद्धार', इत्यादी संवाद स्वरुपात व पौराणिक आशायची तसेच कीर्तनी बाज असलेली नाटके त्यांनी लिहिलेली आहेत.

त्यावेळी अण्णासाहेब किर्लोस्कर ब्रिटिशांच्या राजवटीत मिठाच्या खात्यात काम करीत असत. व्यापारासाठी ते गोव्यात आले असता, डोंगरी येथे सादर झालेल्या बांदकर लिखित 'शुकरंभा संवाद' या नाटकाचा प्रयोग बघण्याचा योग  किर्लोस्करांना आला. किर्लोस्करांनी तो प्रयोग बघितला. त्यांना तो भावला. नंतर ते बांदकरांना

जाऊन भेटले व असे प्रयोग महाराष्ट्रात करण्याची अथवा नाट्य संहितेची मागणी यांनी केली पण बांदकरांनी स्पष्ट नकार दिला. बांदकरांनी किर्लोसकरांना नाटक लिहिण्याची स्पूर्ती होईल व यश मिळेल असा आशीर्वाद दिला. त्यानंतर अवघ्या दोन वर्षांनी अण्णासाहेब किर्लोसकरांनी 'संगीत शाकुंतल' हे नाटक लिहिलं व १८८० या साली या नाटकाचे सादरीकरण झाले.

नाट्य प्रयोगांची सुरुवात गोव्यात  कधी झाली हे नेमके पणे सांगणे कठीण आहे. असे असले तरी प्राचीन काळातील  गोमंतकीय कवी कृष्णदास शामा यांच्या काव्यात 'नटधर' व 'रंग' अशा नाटकाच्या संबंधीत असणारे शब्द त्यांनी वापरलेले दिसून येतात.

१५५७ पासून १८८३ पर्यंत  गोमंतकात नाटक अस्तित्वात होते याचे अनेक पुरावे दिसून येतात.  १८६६ साली काला खर्चाची करून ठेवलेली नोंद गोव्यातील वेरें-फोंडा येथील दप्तरात आढळते. असे अनेक संदर्भ गोमंतकीय नाट्य संबंधीत आढळतात व त्यावरुन असे लक्षात येते की गोमंतकीय नाट्य परंपरा ही खुप जूनी आहे.

गोमंतकात अनेक नामवंत नाटककार लाभले. या नाटककारांनी गोमंतकीय नाटकाला जपून ठेवले. त्यांच्या नाट्य लेखनाची दखल घेणे महत्वाचे ठरते. रघुनाथ शेट सावंत यांनी दशावतारी नाटक लिहिले व १८१८ साला पासून या दशावतारी नाटकाचे प्रयोग होऊ लागले. या नाटकाचे संवाद लिखित स्वरुपात असून या नाटकात ज्यांनी काम केले त्यांच्या नावांचा उल्लेख केलेला आहे. या नाटकात रघुनाथ सावंत यांनी संकासुर-हरिदास संवाद, पूतनावध, उद्धार- कालिया मर्दन इत्यादी कथानके घेतलेली आहेत. व्यंकटेश सावंत हे रघुनाथ सावंत यांचे चिरंजीव होय. यांनी देखील पाच नाटके लिहिली. व्यंकटेश सावंत यांनी आपल्या नाटकात पद्य संवाद लिहिलेले आहेत. 'श्रीकृष्ण लीला', 'शुंभ- निशुंभ', 'नारायणरावांचा फार्स', 'शनिप्रताप', 'कलासुर' आदी पाच त्यांची नाटके आहेत. लाडू प्रभु लवंदे यांनी शंभरावर नाटके लिहिल्याची नोंद मिळते. सिद्ध हस्त नाटककार म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. 'विराटपर्व', घोषयात्रा' इत्यादी त्यांची नाटके होय. सीताराम मणेरीकर हे एक उत्तम नाटककार होते. 'हर्षकाळ' हे त्यांचे नाटक गाजले. स्वतः ते स्त्री-भूमिका उत्तम सादर करीत असे. विश्वनाथ डांगी यांनी देखील अनेक नाटके लिहिली ते स्वतः उत्तम दिग्दर्शक होते त्याचबरोबर विनायक डांगी, भगवंत केणी, गिरीधर कामत,  राघवेंद्र मळये हे समकालीन नाटककार म्हणून त्यांचा उल्लेख करणे महत्वाचे आहे. गोव्यातील शिरोडा गावचे विश्वनाथ पां. हेदे हे देखील उत्तम नाटककार होते. 'नलदमयंती', 'गवळण काला', ही त्यांची प्रसिद्ध नाटके होय.

हीराबाई पेडणेकर यांचा आद्य मराठी नाटककार म्हणून विशेष उल्लेख करणे गरजेचे आहे. संपूर्ण मराठी नाटक सृष्टीतील प्रथम व महत्त्वपूर्ण गोमंतकीय स्त्री नाटककार होय. त्या उत्तम नाटककार तर होत्याच त्याही बरोबर त्या उत्तम कवियत्रिही होत्या. हीराबाई यांनी वयाच्या अवघ्या १८- १९ व्या वर्षी पाहिले नाटक लिहिले. त्यांनी एकूण तीन नाटके लिहिली. 'जयद्रथ विडंबन', 'दामिनी', आणि ' पद्मिनी' आदी तीन नाटके त्यांनी लिहिली. 'जयद्रथ विडंबन' हे नाटक १९०४ साली प्रसिद्ध झाले व 'दामिनी' हे त्यांचे नाटक १९१२ साली प्रसिद्ध झाले.

दत्तात्रय तुकाराम पणशीकर यांचे वेश्याव्यवसायावर आधारित असलेले 'उमेदवारांचे विश्रांतीस्थान' हे नाटक १८६० साली प्रसिद्ध झाले. तसेच त्यांचे 'आनंद लहरी' हे नाटक देखील उल्लेखनीय आहे. मुद्रित स्वरुपातील नाटकाचा मान पणशीकरांना जातो. गोविंद नारायण मडगांवकर यांचे प्रहसनात्मक 'भोजन बंधू पान तंबाखू' हे नाटक १८६८ साली प्रसिद्ध झाले. त्याचप्रमाणे अनेक गोमंतकीय नाटककारांनी नाटके लिहिलेली आहेत. सोनाबाई चिमाजी केरकरीण, कृष्णराव तानाजी अस्नोडकर, भास्कर जयराम आजगावकर, शिरोडा येथील दोन नाटककार विठ्ठल हेदे व विश्वनाथ हेदे, वामन मंगेश दुभाषी आदी गोमंतकीय नाट्य परंपरेतील उल्लेखनीय नाटककार आहेत. अनेक गोमंतकीय नाटकप्रेमी लोकांचे रंगभूमीसाठी विशेष योगदान दिलेले आहे. गोमंतकीय नाट्य वाङ्ग्मयाच्या संखेत बहुमोलाची भर घालण्यासाठी अनेक नाटककारांचा हातभार आहे. हरि विठ्ठल देसाई, मोतीराम गजानन रांगणेकर, बबन प्रभू यांनी विशेष नाममुद्र उमटविली आहे. हौशी नाट्यरंगभूमीसाठी जवळ-जवळ ५५ नाटके लिहिणारे रमाकांत पायाजी हे गोमंतकीय यशस्वी नाट्यलेखक होय.

गोव्यातील नाट्यकलेची परंपरा प्रदीर्घ व अतिशय जूनी आहे. १८१८ पासून गोव्यात मराठी नाटक लिखित स्वरुपात अस्तित्वात होते याबद्दलचे लिखित पुरावे देखील कागदोपत्री मिळतात.

ज्यावेळी नाटकाला लिखित स्वरुप लाभते त्यावेळीच नाटकाला खऱ्या अर्थाने वाङ्ग्मयीन स्वरुप प्राप्त होते असे म्हटले जाते. लिखित स्वरुपालाच नाट्य संहिता अथवा नाटक असे संबोधले जाते. मराठी आद्य नाटककार म्हणून विष्णुदास भावे यांना मानले जात असले तरी गोमंतकात भाव्यांच्याही पूर्वी गोव्यातील काही खेडेगावतून दशावतारी नाटकाचे प्रयोग सादर केले जात असत.

विष्णुदास भावे यांच्या 'सीतास्वयंवर' हे नाटक सादर होण्यापूर्वी विविध नाट्य प्रकार मनोरंजनासाठी सादर केले जात होते. विविध पारंपरिक लोकनाट्य-प्रकार गोव्यात सादर केले जात असत. गोमंतकात वेगवगेळी नाटके

जत्रेच्या प्रसंगी  सादर करण्याची परंपरा अगदी पुरातनकाळापासून दिसून  येते.  गोव्यात उत्सवा जागर, वीरभद्र, लळित, कळसूत्री बाहुल्यांचा खेळ, दशावतारी,काले, रणमाले इत्यादी नाट्यप्रकार सादर केले जात असत.

इ.स. १७७५ ते १७८५ या कालखंडात दहाजणांतर्फे प्रयोग केलेल्या नाटकांच्या खर्चाच्या नोंदी म्हापश्यातील खलप घराण्या द्वारे देवस्थानच्या जमाखर्च्याच्या वहीत केलेली नोंदणी आढळून येते. यावरुन असे दिसून येते की गोमंतकात १८व्या शतकाच्या उत्तरार्धात नाटक हा मनोरंजनाचा एक विशिष्ट प्रकार अस्तित्वात होता. तसेच सीताराम मणेरीकर  यांच्या संग्रही नाट्य संहिता लिखित स्वरुपात जपून ठेवलेल्या आहेत. गोमंतकीय नाट्य परंपरेचा उगम प्रामुख्याने देव देवतांच्या उत्सवा निमित्त अथवा सणां निमित्त झालेला दिसून येतो.

गोमंतकात नाटकाचे विविध प्रकार आहेत. सगळ्यात आधी उल्लेख करावा लागतो तो म्हणजे हौशी रंगभूमीचा. हौशी रंगभूमीनेच गोमंतकात अगदी पुरातन कालखंडापासून नाटकाला जिवंत आणि समृद्ध केलेले आहे. काळाच्या ओघात जसजसा काळ बदलत गेला त्याबरोबर नाटकाचे वेगवेगळे प्रकार पुढे येऊ लागले. हौशी रंगभूमीबरोबर गोव्यात संगीत नाटकांचा इतिहास देखील विख्यात आहे. त्यानंतर गोमंतकात व्यावसायिक नाटके, प्रायोगिक नाटके, लघुनाटके म्हणजेच एकांकिका हाही प्रकार बऱ्यापैकी रुळलेला आहे.

गोव्यात खिश्चनधर्मियांना आवडणारा तियात्र हा नाट्यप्रयोग देखील खूप वर्ष्यांपासून चालू आहे आणि तो समृद्ध व यशस्वी देखील होत आहे. व्यावसायिक,लघुनाटके,प्रायोगिकनाटके,तियात्र इत्यादी सर्व नाट्यप्रकारांत हौशी रंगभूमीला गोमंतकात विशेष महत्व आहे. याचे कारण सांगायचे झाले तर हौशी रंगभूमीनेच गावगावातील कलाकारांना प्रोत्साहन व सादरीकरणासाठी रंगमंच प्राप्त करून दिला. त्यामुळ गोव्यातील कलाकार फुलला. विद्यमान परिस्थितीत नाटक सादर करणे सोपे आहे कारण नवनवीन तंत्रज्ञानामुळे नाटक सादरकरण्यासाठी लागणारी सामग्री सहज उपलब्ध होऊ शकते. पण गोमंतक पारतंत्र्याच्या म्हणजेच पोर्तुगीजांच्या सत्तेत होता त्यावेळी सगळया गोष्टींचे बंधन होते. अशावेळी संघर्षमेकाळात देखील जेष्ठ नाट्यकलाकारांनी नाटक या कलेला जोपासून ठेवण्याचा प्रयत्न केला.

नाटक हे गोमंतकीय माणसाच्या नसानसात भिनलेले आहे. नाटकाबद्दल गोमंतकीयांच्या मनात विशेष आदर आहे. अनेक गोमंतकीय कलाकारांनी गोव्याची नाट्यभूमी रंगवली व रुजवली. नाट्यकला स्वतःपूर्ती न ठेवता ती पुढच्या पिढी पर्यंत पोहचवली. स्थानिक मंदिरे, मांड, इत्यादी धार्मिक संस्थांच्या मदतीने काला, जत्रा, जागोर, खेळ, दशावतार, नाटक इत्यादी वेगवेगळ्या प्रकारांनी गोमंतकाची हौशी रंगभूमी समृद्ध झाली.

# निष्कर्ष :

- नाटक हे भारतीय संस्कृतीचे एक महत्वाचे अंग मानले जाते.
- कळसूत्री बाहुल्यांचा खेळ, लळीते, दशावतारी नाटके, इत्यादी लोकनाट्य परंपरेतून मराठी नाटकांचा उदय व विकास झालेला आहे.
- विष्णुदास भावे यांच्या नाटकांपासून आधुनिक मराठी नाटक समृद्ध झालेले आपल्या लक्षात येते.
- संस्कृत आणि इंग्रजी नाटकांचा आधार घेऊन विपुल मराठी नाट्यनिर्मिती होऊ लागली.
- किर्लोस्करांनी संगीत नाटकाला समृद्ध बनवण्यासाठी विशेष प्रयत्न व प्रभावी अशी कामगिरी दर्शविलेली आहे.
- आचार्य अत्रे, खाडिलकर, गडकरी, रांगणेकर, या नाटककारांनी आपापल्या लेखन कालखंडात नाट्य लेखन करून नाट्यवैभव विशाल करण्यासाठी विशेष हातभार दर्शविलेला आहे.
- पौराणिक नाटकांनी, ऐतिहासिक नाटकांनी, सामाजिक नाटकांनी नाटक या साहित्यप्रकाराला तेज प्राप्त करून दिले.
- स्वातंत्रोत्तर कालखंडात आपल्या भारतीय मराठी नाटकांनी सामाजिक वास्तवाचा कलात्मक आविष्कार घडविला.
- वि.वा.शिरवाडकर, कानेटकर, तेंडूलकर इत्यादी नाटकाकरांनी जीवनविषयक विविध जाणिवांचे चित्रण नाटकाच्या माध्यमातून घडविले.
- स्वातंत्रोत्तर कालखंडात नाटकातील आशय, अभिव्यक्ती, तंत्र, प्रयोग याबाबतीत नवनवीन प्रयोग केले.
- अनेक नाटककारांच्या प्रयत्नामुळेच मराठी नाट्यसृष्टी, मराठी रंगभूमी प्रतिकूल परिस्थितीवर मात करू शकली व पुढे सरसावली.
- तिसवाडी तालुक्यातील डोंगरी गावचे कृष्णंभट्ट बांदकर यांनी गोव्यातील मराठी रंगभूमीचा पाया घातला. कृष्णंभट्ट बांदकर यांनी 'काला' हा नाट्यप्रकार गोव्यात व गोव्याबाहेर प्रसिद्ध केला.

- स्थानिक मंदिरे, मांड, इत्यादी धार्मिक संस्थांच्या मदतीने काला, जत्रा, जागोर, खेळ, दशावतार, नाटक इत्यादी वेगवेगळया प्रकारांनी गोमंतकाची हौशी रंगभूमी समृद्ध झाली.
- मराठी रंगभूमीला गोमंतकानं भरभरून दिलं आहे. मुंबईची मराठी व्यावसायिक रंगभूमी गोमंतकीय कलाकारांनी जगवली टिकवली आहे. मा.दीनानाथ, मा. दत्ताराम, प्रभाकर पणशीकर, रामदास कामत, आशालता, दामू केंकरे ही सगळी गोव्याचीच आहेत.
- कलेच्या या खाणीतून अगणित रत्नांची निर्यात झालीय. पण एका बाबतीत मात्र गोव्याचं वैगुण्य प्रकर्षानं दाखवलं जातं. गोव्याने रंगकर्मी अनेक घडवले, साहित्यकार कितीतरी निर्माण केले. संख्येच्या दृष्टीने विचार केला तर हजारो नाट्यलेखक गोमंतकात होऊन गेले.
- गोमंतकीय लेखकांची सुमारे साडे पाचशेच्या वर नाटके लिखित स्वरुपात प्रसिद्ध झालेली आहेत.
- गोमंतकीय नाटकांचा स्त्रोत लोकनाट्यातून झालेला दिसून येतो.
- गोमंतकीय व्यावसायिक मराठी रंगभूमीला हौशी व लोकनाट्यांनी महान कलाकार दिले.
- आजच्या प्रायोगिक रंगभूमीवर विविध कलाप्रकारांचा वापर आजचे नाटककार करताना दिसतात. त्यामुळे आजच्या बदलत्या जगण्यात नाटककारांनी अजूनही पारंपरिक रंगभूमी आपल्या परिने जपून ठेवलेली आहे.

## संदर्भ


- मराठी संगीत रंगभूमीची वाटचाल (श्रीपाद लाटकर)
- मराठी नाटक आणि डॉक्टर प्रतिमा (मधुरा कोराले)
- भारतीय नाट्यप्रयोगविज्ञान (प्रा. अ. म.जोशी)
- साठोत्तरी मराठी नाटक आणि दलित नाटक (प्रा.डॉ. महावीर विठ्ठल कांबळे)
- नाटक या साहित्यप्रकाराचा सैद्धांतिक परिचय (PDF)
- नाट्यस्वगत स्वरूप आणि समीक्षा (डॉ.सौ. शकुंतला खोत ) १९७७.

# प्रकरण २ - 'हंस थिएटरच्या' स्थापनेची पार्श्वभूमी.

## • प्रस्तावना

साहित्य हे समाजाचे एक प्रतिबिंब असते. प्रत्येक घडणाऱ्या घटनांचे,क्रियांचे पडसाद साहित्यातून दिसून येतात. समाज्यात घडणाऱ्या प्रत्येक घटना या परिवर्तनास कारणीभूत ठरलेल्या असतात. त्यामुळे मराठी रंगभूमी देखील वेगवेगळ्या कालखंडात विविधतेने नटलेली आपल्याला दिसून येते. नाटक या प्रकारातून अनेक अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात. साठोत्तरी मराठी साहित्याचा विचार करत असतांना साहित्यप्रकारामध्ये साहित्य निर्मिती झालेली लक्षात येते. त्यामुळे मराठी नाटक हा साहित्य प्रकार देखील अनेक वैशिष्ट्यांनी व्यापक ठरलेला आहे.

या प्रकरणात आपण साठोत्तरी मराठी नाटकांतील विविध वैशिष्ट्ये त्याचबरोबर नाट्य संबंधित विविध साठोत्तरी प्रवाहांचा थोडक्यात अभ्यास करणार आहोत त्यामध्ये सामाजिक नाटकांचा प्रवाह, ऐतिहासिक नाटकांचा प्रवाह, दलित नाटकांचा प्रवाह आणि फार्सिकल नाटकांचा प्रवाह इत्यादी प्रवाहांचा थोडक्यात अभ्यास इथे करणार आहोत. त्याच बरोबर साठोत्तरी कालखंडातील प्रमुख प्रवाह म्हणजे प्रायोगिक नाटकांचा प्रवाह होय. त्यामुळे मराठी प्रायोगिक रंगभूमीचा विस्ताराने परामर्श घेऊन स्वातंत्रोत्तर काळापासून आजतागायत गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमीसाठी वावरणाऱ्या हंस theatre या संस्थेची पार्श्वभूमी लक्षात घेणार आहोत.

## • प्रकरण२.१ साठोत्तरी नाटकाचे प्रवाह

स्वातंत्र्योत्तर कालखंडात वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळे बदल घडून आले. त्याचप्रमाणे नाटक या क्षेत्रात देखील विविध बदल घडले. नाटकात पूर्वपरंपरा आणि नवीन प्रेरणा यामुळे नाटकाच्या एकंदरीत रुपात उलाढाल झाली. नाटक या साहित्यप्रकारात विविध प्रवाह निर्माण झाले. आणि या नाटकांच्या प्रवाहांनी गरजेनुसार व एकूणच परिस्थिती नुसार वळणे घेतली.

## • २.१.१ सामाजिक नाटके

सामाजिक नाटक हे सामाज्याचेच असते. समाजातील विविध प्रश्न, वृत्ती, प्रवृत्ती,समाजाची स्थिती, प्रगती यावरच प्रामुख्याने सामाजिक नाटक आधारलेले असते. लोकांच्या प्रबोधनासाठी तसेच करमणुकीसाठी नाटक निर्माण होते. आजूबाजूला घडणाऱ्या घटना  समाजातील माणसांच्या इच्छा, आशा-आकांक्षा, सुख-दुःखाच्या गोष्टी, व्यथा, वेदना, इत्यादी सामाजिक नाटकातून आविष्कृत होत असते. सामाजिक नाटकांतून केवळ लोकांचे मनोरंजनच न घडता नाटकाच्या माध्यमातून समाज्याच्या भावभावनांच्या आविश्कृतीचे व जडण घडणीचे यथार्थ चित्रण होत असते.

इ.स. १८४३ ते इ.स. १९४३ हे नाटकाचे पहिले शतक होय. त्यानंतर मराठी रंगभूमीचे रूप प्रकार्ष्याने बदलत गेले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात पौराणिक,ऐतिहासिक नाटके बघण्याची, लिहिण्याची आवड कमी होऊ लागली. व सामाजिक आशयाची अथवा सामाजिक विषयांवर आधारलेल्या नाटकांकडे  हळू हळू लोक वळू लागले. त्यामुळे सामाजिक नाटकांचे युग मोठ्या संख्येने उदयास येऊ लागले. या सामाजिक नाटकांच्या प्रवाहात वि.वा.शिरडवाडकर, पु.ल. देशपांडे व वसंत कानेटककरांनी देखील सामाजिक नाट्य लेखनास सुरुवात केली. अंमलदार (१९५२), भाग्यवान (१९५३), सुंदर मी होणार (१९५८), वेड्याचे घर उन्हात (१९५७), इत्यादी सामाजिक  नाटके सुरवातीच्या काळात लिहिली गेली. विजय तेंडुलकरांचे श्रीमंत (१९५५), माणूस नावाचे बेट (१९५६), इत्यादी अनेक सामाजिक नाटके लिहिली. या नाटकांच्या माध्यमातून समाज्यात असलेल्या मध्यमवर्गीय लोकांच्या कौटुंबिक ताणतणावांचे, सुख-दुःखाचे चित्रण केले. या कालखंडात वेगवेगळ्या नाटककारांनी आपल्या नाट्य लेखनातून समाजातील अनेक प्रश्न स्पष्टपणे मांडलेले आहे.

इ.स.१९६० नंतर बाळ कोल्हटकरांची नाटके रंगभूमीवर येऊ लागली ‘दुरितांचे तिमिर जावो’, ‘आकाशगंगा’, ‘वाहतो ही दुर्वांची जुडी’ इत्यादी. या नंतर अनेक नाटककारांनी सामाजिक नाटके लिहिली त्यामध्ये दत्ता पावसकर,मधुसुधन कालेलकर, पु.भा. भावे, जयवंत दळवी, रत्नाकर मतकरी, चि.त्र्यं.खानोलकर, महेश एलकुंचवार, इत्यादी नाटककारांनी सामाज्याचे, समाज्याच्या स्थितीचे दर्शन नाटक या साहित्यप्रकाराच्या माध्यमातून घडवून दिले. नाटक या बद्दल सांगायचे झाले तर, स्वातंतत्र्यापूर्वी जसे रूप होते तसे रूप स्वातंत्रोत्तर काळात उरले नाही. या कालखंडाचा परमर्श घेतल्यास या कालखंडात शैक्षणिक, कौटुंबिक, सामाजिक, मानसिक घडामोडी असे विषय प्रामुख्याने नाट्यलेखनासाठी कारणीभूत ठरलेल्या आहेत.

## • २.१.२ दलित नाटके

दलित नाटकांचा प्रवाह १९५५ ते १९६० या दरम्यान झाला. ‘दलित’ या शब्दाचा अर्थ वंचित, शोषित, नाडलेले असा आहे. या नाटकांच्या माध्यमातून अस्पृश्य, वंचित, नाडलेले तुडवलेल्या लोकांचा अथवा समूहाचा आवाज नाटकात प्रगट होतो त्यांना प्रामुख्याने दलित नाटके असे म्हटले जाते. इतर साहित्यप्रकाराच्या तुलनेत दलित लेखकांनी दलित जीवन दर्शविण्यासाठी नाटक हा साहित्यप्रकार कमी प्रमाणात वापरलेला दिसून येतो. थोड्याच नाटककारांनी दलितांची व्यथा, वेदना,संघर्ष आणि या सगळयातून तयार झालेल्या आर्थिक परिस्थिती, सामाज, भूख, व्यक्तीचा संघर्ष या सगळयाचे चित्रण मोजक्याच नाटकांमधून आलेले आहे. या नाटकांमध्ये जाणूनबुजून बंड ठोठावले आणि नवीन वाटा शोधून काढल्या. फुले, आंबेडकरांच्या विचारांच्या प्रेरणेने नाटके लिहिली गेली.

## • २.१.३.फार्सिकल नाटके :

मराठी रंगभूमीवर फार्स हा प्रकार प्रामुख्याने पाश्चात्य आणि फारसी प्रभावामुळेच. तसे बघता पाश्च्यात परंपरेत फार्सिकल नाटकांची परंपरा अतिशय जुनी असलेल्याचे दिसून येते. हास्यनिर्मिती करणे हाच प्रामुख्याने फार्सिकल नाटकांचा मूळ हेतू असतो. मराठीत स्वातंत्र्योत्तर काळात अनेक फार्सिकल नाटके आली.

## • २.१.४ व्यावसायिक नाटके

व्यावसायिक मराठी रंगभूमीला फार जुनी परंपरा आहे. व्यावसायिक हेतू या नाटकांच्या मागे असतो. प्रेक्षकांना आवडेल तेच या नाटकांच्यामाध्यमातून केले जात असे. समाजातील अनेक ज्वलंत समस्या घेऊन व इतर वेगवेगळे विषय  म्हणजेच समाजातील अतिशय ताज्या घडामोडीवर आधारित असलेल्या किंवा समाज्यातील वाईट गोष्टी अथवा प्रथा असे विषय घेऊन प्रामुख्याने व्यावसायिक नाटके लिहिली जात. या नाटकांचे स्वरूप प्रामुख्याने बोधपर आणि मनोरंजनपर स्वरूपाचे असते. गंभीर विषयांची मांडणी सुसह्य होण्याकरता विनोदाची पखरण करून विनोदाचे विविध प्रकार वापरून केली जाते.

## • प्रकरण २.२ प्रायोगिक रंगभूमीचा वारसा

मराठी नाटकांच्या परंपरेत प्रायोगिक रंगभूमीचे फार मोठे महत्त्व आहे. नाटकांमधील नावीन्य आणि प्रयोग हे प्रायोगिकमध्ये पाहायला मिळतात. प्रायोगिकता म्हणजे काय याचा विचार करत असतांना दोन अर्थ समोर येतात त्यातील एक म्हणजे खेळ करणे आणि दुसरा अर्थ म्हणजे नवी गोष्ट. प्रयोग करणे या अर्थात नवीन गोष्टींचा शोध घेणे, परंपरागत चालत आलेल्या सवयीची वाट सोडून आजवर जे झालं नाही ते करून बघणे इत्यादींचा समावेश असतो. रंगभूमीच्या संदर्भात फक्त संहितेचा विचार करून चालत नाही तर नाट्यसादरीकरणातील रचनेचा विचार करावा लागतो.  प्रायोगिक नाटक काही वेळा सामान्यापर्यंत पोहोचू शकत नाही. प्रायोगिक नाटकात नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा आदींचा वापर अत्यंत कमी असतो. यात नेपथ्य ‘‘सूचक’ आणि प्रतिकात्मक स्वरूपाचे असते. संगीत मर्यादित असू शकते किंवा अजिबात नसू शकते. यामध्ये संहिता आणि संहितेचा आशय मांडण्यावर अधिक भर दिलेला असतो.

प्रायोगिक नाटकामध्ये प्रयोग कलेची वृद्धी होणे अथवा नवी वाट यांना अधिक महत्व असते. नाट्य सादरीकरणाच्या वेळी रंगभूमीवर प्रयोगाच्या संदर्भात वेगळ्या गोष्टी घडून जातात म्हणजेच नाट्यकृतीतून एखादी वेगळी जाणीव तयार होते, रंगदिशांचा शोध घेतला जातो, एखादी नाट्यकृती रंगभूमीच्या परंपरेला छेद देते,

त्याचबरोबर रंगभूमीला वेगळे वळण अथवा स्वरूप प्राप्त होतांना दिसून येते. अशा नाट्यसंहितांना प्रायोगिक नाट्यसंहिता म्हणून संबोधले जाते.

प्रायोगिकता ही कधी अजाणतेपणी तर कधी जाणिवेतून निर्माण होत असते. कधी कधी रंगभूमीची गरज म्हणून प्रायोगिकता तयार होते तर कधी काळाच्या नुसार अथवा परिस्थितीनुसार प्रायोगिकता निर्माण होत असते.

## • २.२.१. प्रायोगिक रंगभूमीचा उगम व विकास

इ.स. १९४०-१९५० या काळात प्रायोगिक रंगभूमीचा उदय झाला असे मानले जात असले तरी खऱ्या अर्थाने प्रायोगिक ही संज्ञा सुमारे स्वातंत्र्योत्तर काळात १९६० च्या आसपास वापरात येऊ लागलेली दिसून येते.

प्रायोगिक नाटकांचा तीन प्रकारे विचार विनिमय करता येतो.

- मराठी वातावरणात निर्माण झालेली नाटके.
- भारतीय अन्य भाषांतून मराठीत आलेली नाटके.
- परकीय भाषेतून मराठीत आलेली नाटके.

मराठी परंपरेतून आलेले नाटक म्हणून आपण गो.पु.देशपांडे यांचे ‘उध्वस्त धर्मशाळा’ या नाटकाचा विचार करू शकतो. या नाटकात नाटककाराने चर्चात्मक रचनाबंध वापरलेला आहे. करारी व तत्वनिष्ठ मार्कीस्ट नेत्याची कथा चित्रित केलेली आहे. तसेच चि.त्र्यं. खानोलकारांचे ‘एक शून्य बाजीराव’ हे मराठी परंपरेतील नाटक या नाटकाला दशावतारातील मुक्त नाटकाची बैठक दिलेली आहे. संपूर्ण जीवनात प्रत्येकक्षणी येणाऱ्या विदारक सत्यावर हसत हसत टीका करणारा बाजीराव ही या नाटकाची प्रमुख व्यक्ती रेखा आहे. बाजीराव ही व्यक्तिरेखा मराठी नाट्य परंपरेलच्या चौकटीला चीर देणारी आहे. नाटकाचे संवाद बघता परंपरेपासून चालत आलेल्या संवाद पेक्षा वेगळे आहे. अधूनमधून संवाद स्वगत रूपाने येतात तर कधी काव्यात्मक रूपाने येतात. याचबरोबर सतीश आळेकर यांचे प्रसिद्ध ‘महानिर्वाण’ हे नाटक कीर्तन-परंपरेचे बोट धेऊन उभे राहते. महानिर्वाण ही संज्ञा उपहासाने वापरलेली आहे.

मराठी वातावरणात निर्माण झालेल्या प्रकारातील नाटके म्हणून तेंडुलकरांचे ‘घाशीराम कोतवाल’, अच्युत वझे यांचे ‘चल रे भोपळ्या टुणूक टुणूक’ खानोलकारांचे ‘प्रतिमा’ इत्यादी अनेक नाटकांचा उल्लेख या प्रकारात करता येतो.

भारतीय अन्य भाषांतून मराठीत आलेल्या नाटकांचा विचार करतांना गिरीश कर्नाल्ड यांचे ‘हयवदन’ हे नाटक खानोलकरांनी मराठीत त्याच शीर्षकाने मराठीत आणले. या नाटकातील रंगमंचा विषयीकडे बघण्याचा दृष्टीकोन,वेगवेगळ्या लोककलांचा केलेला उपयोग इत्यादी नाटकाचे वैशिष्ट्य उठून दिसते. त्याचप्रमाणे तेंडूलकरांनी गिरीश यांचे ‘तुगलक’ हे नाटक मराठीत आणले. या नाटकाच्या माध्यमातून विविध मानवी स्वभाव, वर्तने, संकल्पना यांचा वेगळ्याच पद्धतीने वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. बादल सरकार यांचे ‘एवं इद्रजीत’ हे बंगाली भाषेतून मराठीत आलेले नाटक होय. या नाटकाचा प्रायोगिक उल्लेख महत्वाचा ठरतो कारण ज्यापाध्तीने या नाटकाची रचना, आविष्कार, विशिष्ट असा आकार, व एकूणच लेखन या कडे बघता असे नाटक मराठी नाटकात दिसून येत नाही. हे नाटक काही नव्या संकल्पनांचा आणि शक्यतांचा नव्याने विचार करण्यास भाग पाडते.

परकीय स्तरांवरून मराठीत आलेल्या नाटकांचा विचार अतिशय महत्वाचा ठरतो. परिवर्तन घडविणे आणि प्रायोगिकता हे आपल्या मराठी नाटकांचे वैशिष्ट्य मानले जाते.

काळानुसार जे काही बादल घडतात त्या बदलांना मराठी रंगभूमीने स्वीकारलेले आहे. त्यामुळे परकीय रंगभूमीवर महत्वाची ठरलेली नाटके आपल्या मराठी रंगभूमीवर देखील आली. वृंदावन दंडवते यांनी मुळ आयनेस्कोच्या ‘चेअर्स’ चे रुपांतर ‘खुर्च्या’ असे केले व ‘रंगायन’ ने रंगमंचावर आणले. या एकांकीकेचा प्रयोग म्हणजे मराठी रंगभूमीवरील अतिशय महत्वपूर्ण अशी घटना होय. अंटिथिएटर या कल्पनेशी जोडलेली रचना असल्याने ज्यावेळी ती आपल्याकडे सादर झाली त्या वेळी ती आपल्याकडील सादरीकरणाच्या पद्धतीपेक्षा निश्चितपणे वेगली होती. अशा प्रकारे अनेक इंग्रजी अथवा अन्य भाषेतील नाटके मराठीत आली ती नाविन्याचे बोट धरुनच आलेली दिसतात.

पु.ल.देशपांडे यांनी शॉ या नाटककाराच्या ‘पिग्मेलियन’ या नाटकाचे ‘ती फुलराणी’ असे मराठी भाषेत रुपांतर केले. मराठी रंगभूमीचा विचार करत असतांना मराठी प्रायोगिक रंगभूमी हे मराठी रंगभूमीचे अजरामर असे दालन आहे.

प्रायोगिक रंगभूमीचा विचार करतांना अनेक नाटककारांचा उल्लेख होणे गरजेचे ठरते. त्यात चि.त्र्यं. खानोलकर, महेश एलकुंचवार, मधुकर तोरडमल, रत्नाकर मतकरी, वसंत कानेटकर, अनिल बर्वे, यांची नाटके प्रायोगिक रंगभूमीवर प्रायोगिक रंगभूमीची वाट चालत असतांना व नवनवे प्रयोग करताना दिसून येतात. अनेक नाटकारांनी परंपरेला छेद देत नवनवीन विषय हाताळले व नवीन नाट्य सादारीकरणाची जाणीव करून दिली. स्वातंत्रोत्तर काळातील प्रायोगिक नाटक हे विविध रंग व दिशांचा शोध घेतांना दिसून येते. याच प्रायोगिक नाटकाच्या माध्यमातून नवे आदर्श घेऊन आपली मराठी रंगभूमी अधिकाधिक समृद्ध झाल्याचे लक्षात येते.

## • २.२.२ मराठी प्रायोगिक नाटकांचा आशय

प्रायोगिक रंगभूमीचे दालन विशाल आहे. साठोत्तरी प्रायोगिक नाटकांच्या माध्यमातून आजचा माणूस एकलेपणाने कसा ग्रासलेला आहे, अफाट गर्दीत देखील एकटा व गर्दीपुढे असाहाय्य झालेला आहे इत्यादीवर भाष्य करणारी नाटके चित्रित होतात. आपुलकी, आपलेपणा, संवाद कसा तुटक झालेला आहे हे या नाटकांच्या माध्यमातून लक्षात येते. स्वातंत्रोत्तर काळात औद्योगिकीकारणांमुळे माणसात निर्माण झालेल्या दरीचे चित्रण तसेच समाजात वाढलेला भ्रष्टाचार, दांभिकतेचे परखड चित्रण प्रायोगिक नाटकांच्या आशयाच्या माध्यमातून चित्रित होताना दिसून येते. 'गिधाडे' या सारख्या नाटकातून मध्यमवर्गीय कुटुंबात असणारे नाते आणि नात्यातील ताणतणावाचे चित्रण केलेले आहे. तसेच अनौरस संततीचा प्रश्न देखील चित्रित केलेला आहे. त्यानंतर 'सखाराम बाईंडर' सारखे नाटक या नाटकांत बेबंद कामवासनेचे, समाजात असलेल्या अश्लील बाजूचे मनाला धक्का देणारे असे चित्रण केलेले आहे. प्रायोगिक नाटकांचा आशय हा बेधडक आहे. या नाटकांचा आधार घेऊन नाटककार सत्य परिस्थिती मांडतांना दिसून येतो.

आजच्या घडीला देखील स्त्रियांची विक्री होणे, स्त्रीला हिनतेची वागणूक देणे पोटा-पाण्यासाठी स्त्रीला स्वतःची अब्रू विकावी लागणे उदा.'कमला' हे नाटक. . अशा स्वरूपाचा आशय आपल्याला प्रायोगिक नाटकांच्या माध्यमातून दिसून येतो.

## • २.३.१.गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमी

गोव्यातील मराठी रंगभूमीचा उदय व विकास हा हौशी आणि उत्सवी रंगभूमीच्या माध्यमातून झाला. म्हापशातील काही नाट्यवेड्या लोकांनी संगीत नाटकाचे वेड गोव्यात आणले. रामनवमीच्या निमित्ताने वार्षिकोस्तव 'शाकुंतल' या नाटकाचा प्रयोग सादर केला. असे अनेक नाट्यप्रयोग म्हापशेकरांनी सादर केले. त्यांचे प्रयोग बघून इतर गावातील लोकांना प्रेरणा व स्फूर्ती घेतली  आणि दरवर्षी होणाऱ्या जत्रोत्सवाच्या निमित्ताने नाट्यप्रयोग सादर करू लागले.

याच दरम्यान कळंगुट येथील राया साळकर आणि गोविंद साळकर यांनी मिळून एक संगीत नाटक कंपनी स्थापन केली आणि गोव्यात व गोव्याबाहेर जाऊन नाटकांचे प्रयोग सादर केले. याच नाट्य कंपनीत काही काळ गोव्यातील दिग्गज नट बाळकोबा नाटेकर व दत्तोपंत हल्याळकर वावरत होते. गोव्यातील मराठी रंगभूमीवरील हीच प्रथम सुसंघटीत अशी नाटक कंपनी होय.

१८१८ नंतर गोव्यातील उत्सवी रंगभूमीवर अनेक नाट्यमंडळे उदयास आलेली आहे. धारगळ येथील श्रीशांतादुर्गा नाट्यसमाज, बांदकरांनी स्थापन केलेली रघुनाथ प्रासादिक नाट्य मंडळ, गोवेकर स्त्री संगीत मंडळी, इत्यादी अनेक गोवाभर  नाट्यसंस्थानी आकार घेतला. अशाच गोव्यातील काही नाट्यमंडळांनी गोव्याबाहेर जाऊन व्यवसाय केला. त्यात नाट्यकलादर्श, प्रभात, ललितप्रभात इत्यादी नाट्यमंडळीचा उल्लेख करता येतो.

या संस्थांची नाटके पाहण्याकरता बांदा, कुडाळ, कणकवली, सांगली, अशा भागातून रसिक लोक येयचे. त्या वेळेचे कलाकार लोक मनारायण सावकार, दत्ताराम सावकार, नाटेकरबंधू, रघुवीर मणेरीकर, इत्यादी दिग्गज कलाकार प्रख्यात होते. मराठी रंगभूमीसाठी अभिनयाने प्रेक्षणीय करणाऱ्या गोमंतकीय दिग्गज कलाकारांची यादीच खूप मोठी आहे.

संगीत रंगभूमीच्या कालखंडात गोव्याने महाराष्ट्राला मा. दीनानाथ यांच्यासारखे संगीत विद्वान दिले. त्याच बरोबर गिरिजाताई केळकर, जोत्स्ना भोळे, केशरबाई बांदोडकर यांच्यासारख्या स्त्री अभिनेत्री देखील गोव्याने बहाल केलेल्या आहे. एकूणच रंगभूमीच्या उदय आणि विकास काळापासून गोव्यातील दिग्गज कलाकारांनी  महाराष्ट्रात जाऊन नाव  लौकिक कमावलेले आहे.

गोव्यात स्वातंत्र्योत्तर काळात रंगभूमीवर काही बदल झालेले दिसून येतात. स्वातंत्र प्राप्ती नंतर गोव्यात राज्य स्तरीय स्पर्धा कला अकादमी आयोजित करू लागली. सुरुवातीला स्पर्धेचे स्वरूप देखील हौशी आणि उत्सवी रंगभूमीचे होते. पण नंतरच्या काळात नाटकात सुधारणा दिसून येऊ लागली. नाटकाच्या लिखाणात नवीन प्रयोग दिसून येऊ लागले. अनेक गोमंतकीय नाटककार स्वतः नव्या धाटणीचे नाट्य लेखन करू लागले.

## • २.३.२.'हंस थिएटर' या संस्थेची पार्श्वभूमी :

गोमंतकीय नाट्य परंपरा फार जुनी आहे. उत्सवी आणि हौशी रंगभूमीच्या माध्यमातून चालू झालेली गोमंतकीय मराठी नाट्य परंपरा पुढे समृद्ध होत गेली आणि त्यात भर पडली. गोमंतकीय नाट्यप्रेमींनी गावागावात नाट्यसंस्था निर्माण केल्या. पेडणे पासून काणकोण पर्यंत अनेक नाट्यसंस्था आपल्याला दिसून येतात. या संस्था विविध ठिकाणी गोव्यात त्याचबरोबर गोव्या बाहेर देखील जाऊन नाटकाचे प्रयोग सादर करत. अशा अनेक संस्थाचा उल्लेख आपण करू शकतो. उदा. रुद्रेश्वर, अथश्री, सातेरी, कला शुक्लेंदू इत्यादी. अशाच एका संस्थेची पार्श्वभूमी इथे वर्णन केलेली आहे.

## • २.३.३. 'हंस' या संस्थेच्या स्थापनेमागची कथा

गोमंतकातील अंत्रुज महालात अशीच एक संस्था १९५० साली स्थापन झाली. या संस्थेच्या स्थापनेची पार्श्वभूमी पुढील प्रमाणे सांगता येते. या संस्थेच्या स्थापने विषयी एक घटीत घटना सांगितली जाते ती अशी, 'हंस संगीत नाट्यमंडळी' या संस्थेचे निर्माता विश्वनाथ नाईक वयाच्या नवव्या वर्षी गोमंतकीय मराठी रंगभूमीवर उतरले. गोव्यातील फोंडा तालुक्याच्या आसपास गावात विश्वनाथ नाईक यांचे नाव अभिनेता, नट म्हणून गाजत होते.

अवघ्या १४-१५व्या वर्षीच ते एका संस्थेच्या नाटकात भूमिका साकारायला म्हणून गेले. त्यावेळी जी भूमिका विश्वनाथ करणार होते त्या भूमिकेची वेशभूषा करून अजून एक नट तिथे तयार होता. हे दृश पाहून विश्वनाथ यांना राग आला. तेव्हा ते जाऊन दिग्दर्शकाकडे बोलत असता त्यांच्यामध्ये थोडीफार बाचाबाची झाली. त्यानंतर दिग्दर्शकाने विश्वनाथ यांना म्हटले, "तुला काय माहिती आहे एक संस्था चालवण म्हणजे काय असत ते? इतकच

जर आहे तर एक संस्था चालवून दाखव." हे अपमानास्पद उद्गार विश्वनाथांनी एक आव्हाहन म्हणून स्वीकारले आणि घरी परतले.

घरी परतल्यावर त्यांनी आपल्याच गावातील आपल्याच वयाच्या काही मुलांना बरोबर घेतले आणि एक स्वतःची अशी व स्वतःच्या हक्काची अशी एक नाट्य संस्था स्थापन करण्याचा निश्चय केला. पुढे काही महिन्यातच यांनी विश्वनाथांनी आणि त्यांच्या मित्रांनी मिळून हनुमान मंदिराच्या रंगमंच्यावर 'लवांकुश' या नाटकाचा यशस्वी प्रयोग सादर केला व १९५० साली 'हंस संगीत नाट्यमंडळी' असं नाव नाट्य संस्थेला दिले. अतिशय सुंदर व जन्मापासूनच सौदर्याने माखलेला, रुबाबदार असणाऱ्या हंस या पक्षावरून विश्वनाथ नाईक यांनी आपल्या संस्थेचे नामकरण केलेले आहे. अवघ्या १५व्या वर्षी एक संस्था स्थापन करून गोमंतकीय मराठी रंगभूमीला समृद्ध करण्याची जिद्द फोंड्यातील विश्वनाथांनी दाखवली. अशी सत्य घटना 'हंस' च्या स्थापने विषयी सांगितली जाते.

## • २.३.४.'हंस' संस्थेची वाटचाल

'हंस संगीत नाट्यमंडळी' संस्था फक्त गोव्यातच नव्हे तर गोव्याच्या बाहेर जाऊन देखील नाटकांचे प्रयोग सादर करू लागली. अनेक नाट्यस्पर्धामध्ये भाग घेऊन पारितोषिके प्राप्त करून संस्थेची एक नवीन ओळख गावागावात निर्माण केली. त्या काळात इतक्या लहान वयात हे साध्य करणे दिसते तेवढे सोपे अजिबात नव्हते.

विश्वनाथांनी आपल्या बरोबर गोमंतकातील नाट्यकलाकारांना त्यात किशोरी हळदणकर, अलका वेलिंगकर, शशिकला नागेशकर, तुळशीदास लोटलीकर, शांताराम नाईक, बाबनी गावकर, सखाराम मयेकर, तातोबा वेलिंगकर, तुकाराम फोंडेकर, विष्णू बागकर, मा. काशीनाथ, गुलाब मंगेशकर, इत्यादी उत्कृष्ट नटांना एकत्र घेऊन विविध नाटके राज्यभरात उत्सवानिमित्त व स्पर्धामध्ये सादर केली. गोमंतकीय मराठी रंगभूमीच्या इतिहासात 'हंस' नाट्यमंडळाचे नाव व्यापक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय, सामाजिक, साहित्य, संस्कृती अशा विविध क्षेत्रात अनेक बदल झालेले आपल्याला दिसून येतात. आणि या सगळ्याचे एकूणच पडसाद संस्थेच्या कार्यावर व नाटकाच्या सादरीकरणांतून चित्रित होतांना दिसतात.

नाटक केवळ मनोरंजनासाठी नव्हे तर त्यातून प्रेक्षकांना एक नवा विचार देणे हे सुत वाक्य लक्षात घेऊन या संस्थेने 'मत्स्यगंधा', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'ययाती आणि देवयानी', अशी संगीत, ऐतिहासिक स्वरुपाची सुरुवातीला नाटके सादर करून मग 'चक्रव्हूव', 'गणपतवाणी', 'पंडितराज जगन्नाथ' अशी सामाजिक, वैचारिक व लोकनाट्य स्वरुपाचे नाट्यप्रयोग रंग्माच्यावर सादर केले. तसेच भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक प्रमुख स्त्री योद्धा म्हणजे राणी लक्ष्मीबाई होय. यांच्यावर आधारलेली 'राणी लक्ष्मीबाई' या नाट्यकृतीची निर्मिती संस्थेने केली. याच दरम्यान विश्वनाथ नाईक यांची पुढली पीढी हळू हळू रंगभूमीवरती नावलौकिक कमवू लागली होती.

पुढे एकदा नाटकासाठी मुंबईला गेले असता विश्वनाथांनी 'वेटिंग फॉर गोदो' ही नाट्य निर्मिती पहिली व ते भारावून गेले. 'वेटिंग फॉर गोदो' हे नाटक प्रायोगिक स्वरूपाचे होते. हे नाटक त्यावेळी त्यांना फारसे कळले नाही. पण या नाटकाने सलग दोन तास खेळवून ठेवले, लक्ष वेधून ठेवले. आणि त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की जर आपल्या संस्थेचा विकास व प्रसार प्रचार व्हायचा असेल तर अशा प्रायोगिक स्वरुपाची नाटके रंगभूमीवर सादर केली पाहिजे. या घटने नंतर खऱ्या अर्थाने 'हंस' ही संस्था साठोत्तरी कालखंडातील नाटकाच्या प्रमुख प्रवाहाकडे म्हणजेच मराठी प्रायोगिक रंगभूमीकडे वळली.

स्वतःच्या मर्यादा लक्षात घेऊन विश्वनाथांनी गोव्यातील नामवंत नाट्यलेखक व दिग्दर्शक किशोर बोरकर यांना संस्थेत बोलावून घेतले. किशोर बोरकरांनी काही प्रायोगिक स्वरुपाची नाटकांचे मंचन केले व गोवाभर विविध ठिकाणी प्रयोग देखील केले. पुढे जाऊन विश्वनाथ यांनी 'एनएसडी'तून उत्तीर्ण झालेले शिवदास घोडके यांना हंस संगीत नाट्यमंडळी या संस्थेच्या नाटकाचे दिग्दर्शन करण्यासाठी मुद्दाम मुंबईहून बोलावून घेतले. त्यांच्याकडून अनेक नाटकांचे दिग्दर्शन करवून घेतले. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'घोडे' या प्रायोगिक नाटकाला रसिक-प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद प्राप्त झाला.

अगदी कोवळ्या वयात नाटकाचे महत्व जाणून गोमंतकीय मराठी रंगभूमीसाठी झोकून दिलेल्या व संगीत रंगभूमीकडून सामाजिक रंगभूमीकडे आणि त्यानंतर नवीन प्रवाहाकडे वाटचाल करणाऱ्या विश्वनाथ यांनी 'हंस' च्या कार्यातून आणि अभिनयातून देखील निवृत्ती घेतली व गोमंतकीय नाटकाची व आपल्या हक्काची संस्था हळुवारपणाने आपल्या भावी पिढीच्या हाती सोपवली. पुढे 'हंस संगीत नाट्यमंडळी' या संस्थेचा वारसा विश्वनाथ नाईक यांच्या सुपुत्रांनी सांभाळला.

घरात संपूर्ण वातावरण हे नाटकाच असल्यामुळे पुढची पिढी देखील जन्मापासूनच नाटकाशी जोडली गेली. घरात सहा सहा महिने नाटकाच्या तालमी चालायच्या त्यामुळे रवींद्र, विजयकुमार,सोमनाथ,दिलीपकुमार, सुजाता या मुलांचे सबंध अनेक नाटककारांशी येत असत. सतत नाटकां विषयीच्या चर्चा होत असल्यामुळे आपोआप ही दुसरी पिढी देखील नकळतपणे नाटकाकडे वळली.

विश्वनाथ नाईक यांचे बोट धरून त्यांची पाचही मुले रंगमंचावर आणि रंगमंच बाहेर जमेल ते आणि पडेल ते काम करत. आणि त्याच बरोबर शिक्षण देखील चालूच होते. नोकरी आणि नाटक दोन्ही व्यवास्थित सांभाळल्या. पुढे जाऊन विजयकुमार यांनी नोकरी सोडून १९८८ मध्ये नाटकात स्वतःला झोकून द्यायचा निर्णय घेतला.

नाटकांच्या सगळया कामांमध्ये विजयकुमार आणि त्यांची भावंडे एकमेकांना सहकार्य करत.अनेक वेळा त्यांच्या गप्पा रंगत आणि नकळतपणे ह्याच गप्पा पुढच्या नाटकाचा विषय बनत. या भावंडानी लिहिलेली कितीतरी नाटके ही अशाच गप्पावर आधारलेली आहेत. या पाच भावंडाबरोबर विष्णू वाघ देखील असायचा.

विश्वनाथ यांनी लावलेल्या नाट्य नावाच्या रोपट्याला या भावंडांनी घातले. आणि आयुष्याच्या ३५ व्या वर्षी विजयकुमार नाईक यांनी नाटकालाच विशेष असे महत्व दिले. संपूर्ण गोव्यात आणि गोव्याबाहेर देखील चार चौघात लोकप्रियता प्राप्त केली होती.

पुढे गोव्याबाहेर जाण्यासाठी अनेक संधी मिळाल्या पण आपल्या मातीला आणि आपल्या गोमंतकाला सोडून जाण्याचे टाळले. गोव्यातच राहून गोमंतकीय मराठी रंगभूमी समृद्ध करणे आणि गोमंतकात रंगकर्मी तयार करायचे. तसे बघता गोमंतकातील कलाकाराला जर संधी मिळाली तर कला क्षेत्रात नक्कीच वाव मिळवेळ. हे लक्षात घेऊन विजयकुमार यांनी फोंडा येथेच ‘हंस संगीत नाट्यमंडळी’ सोबत ‘हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर’ १९९३ साली चालू केले. या ट्रेनिंग सेंटर च्या माध्यमातून विजयकुमार नाईक यांनी वेगवेगळी नाटकांची अंगे जाऊन घेऊन, नव्या पिढीला नाटकाचे भान यावे म्हणून नाट्यकार्यशाळा व विविध उपक्रम चालू केले. सतत जुन्या परंपरेच्या चौकटी मोडून नाटकात नवीन काय करू शकतो म्हणजे नाटक आणखीन समृद्ध होईल यासाठी प्रयत्न सदैव चालू ठेवले.

‘रंगयात्रा’, ‘नाटक घरोघरी’, असे अनोखे उपक्रम राबवून विजयकुमारांनी गोव्यात प्रायोगिक रंगभूमीची तर ओळख करून दिलीच पण त्याचबरोबर अनेक नव्या पिढीतील नव्या युवक कलाकारांना देखील नाटकाची आस आणि ओड लावलेली आहे.

विश्वनाथ यांनी चालू केलेल्या हंस संगीत नाट्यमंडळी या संस्थेतील दुसऱ्या पिढीने गोमंतकातील मराठी प्रायोगिक रंगभूमीला आणखीन समृद्ध केले. त्यात विजयकुमार यांच्याबरोबर त्यांची भावंडे तर होतीच पण त्यांचा मित्र परिवार देखील नाटकासाठी वावरत होता, जमेल ती कामे करत होता.

एकूणच सांगायचे झाले तर नव्वोदत्तरी गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमी लेखनाने विशाल व प्रगल्भ करण्यासाठी डोंगरी गावचे विष्णू सूर्या वाघ, सोमनाथ नाईक, दिलीपकुमार नाईक इत्यादींचा मोठा वाटा आहे. चौकटी बाहेर जाऊन दिग्दर्शन करणारे दिलीपकुमार नाईक, शिवदास घोडके, किशोर बोरकरांन सारखे नाट्य दिग्दर्शक गोमंतकीय रंगभूमीला मिळाले.

विजयकुमार नाईक यांनी देखील कोणतीही अपेक्षा मनाशी न ठेवता संस्थेची पुढील सूत्रे वडिलांसारखी कळत-नकळतपणे त्यांच्या पुढच्या नव्या पिढीकडे म्हणजेच कौस्तुभ व रोहन यांच्या हाती सोपवली.

कौस्तुभ आणि रोहन यांनी संस्थेची जबाबदारी तितक्याच उत्साहाने स्वीकारली आणि हंस संस्था अजून समृद्ध करण्यास सज्ज झाले.

कौस्तुभ आणि रोहन म्हणजे हंस या संस्थेची तिसरी पिढी होय. विजयकुमार आणि त्यांच्या भावंडानी ३०-३५ वर्षे संस्था प्रगल्भ करण्यासाठी त्यांच्यापरीने होईल ते प्रयत्न केले व त्यात त्यांना यशही मिळाले. आता नव्या युगातली व नवे आधुनिक विचार करणारी त्यांची मुले संस्थेच्या कामात रुजू झाली.

गोव्यात कौस्तुभ यांची ओळख एक संशोधक म्हणून आहे, त्यांनी नाट्यशास्त्रावर संशोधन केलेले आहे. आणि सध्या गोव्याच्या इतिहासावर संशोधन अमेरिकेतील विद्यापीठात करत आहे.

कौस्तुभ यांनी कादंबरीकार अमिता काणेकर यांच्या ‘अ स्पोक इन द व्हील’ या कादंबरीवर आधारलेले ‘अव्याहत’ हे नाटक लिहिले. हे नाटक बौध्द तत्वज्ञानावर असून, या नाटकाने गोव्यातच नव्हे तर गोव्याबाहेर देखील कौतुकाची थाप मिळवली. या नाटकाने गोमंतकीय मराठी नाट्यस्पर्धेत व महाराष्ट्र राज्य हौशी नाट्यस्पर्धेत व इतर विविध नाट्यस्पर्धामध्ये ‘अव्याहत’ ने अनेक पारितोषिके प्राप्त केलेली आहेत. या नाटकाच्या यश बघून आणि नव्या युवकांचे नाटका बद्दल असलेली आवड बघून रंगमंचावरील तिसरी पिढी देखील खणखणीत असलेल्याचा  एक विश्वास दुसऱ्या पिढीला मिळाला.

कौस्तुभ संशोधक वृत्तीचा आणि रोहन हा एक उत्तम नट, दिग्दर्शक आहेच पण त्याच बरोबर एक उत्तम संगीतकार देखील आहे. विविध वाद्ये अगदी सहजपणे वाजवतो. रोहन नाटकाच्या सादरीकरणात प्रायोगिक अंगाने बघणारा आहे. त्यामुळे या दोघांनी 'हंस' च्या पुढील वाटचालीबद्दल एक निर्धास्तपणा आणलेला आहे.

नाटककार विश्वनाथ नाईक यांनी १९५० साली  स्थापन केलेली संस्था म्हणजे 'हंस संगीत नाट्य मंडळी' ह्या संस्थेला 'इंटेलकचुअल' संस्था म्हणून ओळख करून देण्यामागे कौस्तुभ आणि रोहन या दोघा भावंडांचा आहे.

## • निष्कर्ष

- या प्रकरणाच्या माध्यमातून साठोत्तरी काळात नाटक ह्या साहित्यप्रकारात घडलेले बदल जाणून घेतले.
- साठोत्तरी नाटकाचे विविध प्रवाह जाणून घेतले. नाटकात आलेला नवीन धाटणीचा आशय त्याचबरोबर नाट्य लेखनातील प्रायोगिकता लक्षात घेतली.
- व्यावसायिक नाटके, दलित नाटके, फार्सिकल नाटके इत्यादी विविध प्रवाह थोडक्यात अभ्यासले. आशय आणि अभिव्यक्तीत दिसून येणाऱ्या प्रायोगिकतेबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न इथे केला.
- साठोत्तरी काळातील प्रमुख प्रवाहाची ओळख करून घेतली.
- प्रायोगिक रंगभूमी म्हणजे काय आणि प्रायोगिक रंगभूमीचा उदय व विकास.
- गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमी बद्दलची माहिती. नाट्यस्पर्धांच्या माध्यमातून गोमंतकीय नाट्य परंपरेला प्राप्त झालेली प्रायोगिकता जपून ठेवण्यासाठी अनेक नाट्यसंस्था उदयास आल्या.
- गोमंतकात मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणाऱ्या विशेष अशा संस्थेच्या स्थापणे विषयी थोडक्यात माहिती आणि एकूणच पार्श्वभूमी बद्दल या प्रकरणातून अभ्यासलेली आहे.
- हंस या नाट्यसंस्थेने तीन पिढया घडवल्या. या संस्थेचा प्रवास हौशी रंगभूमी पासून सुरु होऊन, व्यावसायिक, प्रायोगिक रंगभूमीकडून हळू हळू इंटेलेक्चूअल कडे प्रवास करतांना दिसून येते.

# प्रकरण ३ 'हंस थिएटर' चे नाट्य विषयक उपक्रमांचे विश्लेषण

## • ३.१.प्रस्तावना

स्वातंत्र्योतर काळात गोमंतकातील मराठी रंगभूमी बहरली व रंगभूमीच्या क्षेत्रात सर्जनशील वाढ होऊ लागली. याच काळात गोमंतक साहित्य सेवक मंडळ नंतर नाट्य अकादमी म्हणून ज्याची ओळख होती म्हणजेच आजची कला अकादमी राज्य स्तरीय मराठी नाट्यस्पर्धा आयोजित करू लागले. सुरुवातीच्या काळात वाढत्या स्पर्धे मुळे नाटकांचा दर्जा हा उत्सवी रंगभूमीवर प्रतिबिंबित होऊ लागला पण, काही काळाने नाटकांच्या सादरीकारणांमध्ये नवीन बदल घडताना दिसून येऊ लागले. थोडक्यात अशा स्पर्धामुळे गोमंतकात प्रायोगिक रंगभूमीची ओळख व पायाभरणी होऊ लागली.

‘हंस थिएटर’ ही नाट्य संस्था स्वातंत्र्योत्तर काळापासून गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमीवर नावाजलेली आहे. प्रयोगीकतेचे बोट धरून सतत नाटकात विविधता आणणे हा या संस्थेचा गुणधर्मच. नाटक आणि नाटकासंदर्भात विविध उपक्रमांचे सातत्याने आयोजन करून नाटकाविषयी जनमानसात आपुलकी निर्माण करण्यासाठी या संस्थेने केलेले कार्य गौरवास्पद आहे. त्यांनी आयोजित केलेल्या उपक्रमांच्या माध्यमातून गोव्यात अनेक नवीन कलाकार घडले. गोव्यातील अनेक कालकारांना त्याच्यात लपलेल्या कलाकाराला शोधण्यासाठीची मदत या संस्थेने केलेली आहे. हंस ने नाटकाच्या कार्यशाळा, घरोघरी नाटक, शिका १०० मराठी गाणी, मुकनाट्य, संगीतातून नाटक, लहान मुलांसाठी अभिनयाच्या कार्यशाळा, असे अनेक नाटकाशी निगडीत उपक्रमांचे आयोजन केले.

संस्थेने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांची पार्श्वभूमी, बांधिलकी इत्यादी बद्दलची माहिती या प्रकरणाच्या माध्यमातून जाणून घेणार आहोत.

या संस्थेने नाटके रंगभूमीवर सादर करता करता नवीन मुलांना नाटकाकडे वळविण्यासाठी सातत्याने अनेक उपक्रम घडवले. या विविध उपक्रमांच्या माध्यमातून गोव्यातील अनेक नाट्य कलाकार घडले,आणि आज गोव्याबाहेर जाऊन नावलौकिक करत आहेत.

## • ३.२. अभिनयाच्या कार्यशाळा

विजयकुमार नाईक यांनी ज्यावेळी १९८८ मध्ये 'हंस' ची धुरा हातात घेतली व १९९३ साली हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर ची स्थापना केली. त्यावेळी त्यांनी संपूर्ण जीवन नाटकात झोकून द्यायचे असे ठरवले होते. नाटकावरच्या प्रेमा खातर व तरुण मुलांना नाटक शिकवायला आणि त्याचबरोबर गोव्याबाहेरील इतर राज्यात नाट्या विषयी चालू असलेल्या चळवळीचे, हालचालींचे भान यावे म्हणून स्वतः विजयकुमार उपक्रम आयोजित करण्यासाठी स्वतःच्या खिशातले पैसे काढत. आणि त्यातून विविध उपक्रम यशस्वीपणे निर्माण करत. गोव्यातील प्रत्येक मुल एकदातरी रंगभूमीवर यावे अशी आशा मनाशी धरून त्यांनी १९९३-१९९५ या दरम्यान अभिनयाच्या कार्यशाळा, अभिनयाची निवासी नाट्यकार्यशाळा घेण्यासाठीचा प्रारंभ केला.

निवासी नाट्यकार्यशाळा प्रामुख्याने वर्षातील दोन मोठ्या सुट्टीत घेतल्या जात असे. विजयकुमार नाईक यांचे संपूर्ण घराणं नाट्यमय असल्यामुळे ही निवासी शिबीरे म्हणजे एक कार्यच असल्या सारखे घरातील मंडळी मदत करत. कार्यशाळेसाठी आलेल्या मुलांना जेवण करून देण्यासाठी विजयकुमार नाईक यांची पत्नी तिथे असे. व तिच्या मदतीला एकनाथ नाईक व राजदीप नाईक देखील असत. तसेच इतर काही सहकारी वर्ग कायम त्यांच्या सोबत असे.

या नाट्य विषयक निवासी कार्यशाळामध्ये दरवर्षी नित्याने भाग घेणारी मुलं असायचीच पण त्याचबरोबर दरवेळी २०-२५ नवीन मुलं भाग घेयची व कार्यशाळेच्या शेवटच्या दिवसापर्यंत ही नवीन मुले हंस थिएटर परिवाराचा भाग बनून जायची. कार्यशाळेचे एकंदरीत वातावरण बघता ते अतिशय हसतं खेळतं आणि मंगलमय असायचे. त्यामुळे अवघ्या सात- आठ वर्षाची नवीन मुलं देखील नाट्य कार्यशाळेत रमून जायची.

कार्यशाळेच्या दरम्यान केवळ अभिनयच शिकवला जात नसून इतर रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना अशा रंगभूमीशी निगडीत गोष्टी या शिबिरामध्ये शिकवल्या जात. त्याचबरोबर संस्कार आणि शिस्त अशा काही गोष्टी अप्रत्यक्षपणे अंगवळणी लागत होत्या. संस्थेच्या तर्फे कार्यशाळेत बाहेरून म्हणजेच मुंबईतून मार्गदर्शन करण्यासाठी दिग्गज लोकांना बोलावले जात. त्यात अतुल कुलकर्णी सारखे नामवंत कलाकारांचा देखील सहभाग असे.

निवासी शिबिरांचे स्वरूप अगदी गंमती जमतीचे असायचे. एकूण १० ते १५ दिवसांचे हे निवासी शिबीर फोंड्यातील लोकविश्वास प्रतिष्ठान येथे घेतले जात. या शिबिरात वयाच्या सातव्या आठव्या वर्षापासून ते महाविदयालयीन मुले भाग घेत.

शिबिराचे पहिले काही दिवस एकमेकांशी ओळख करून घेणे, एकमेकांकडे बोलणे व एक समूह तयार करणे, मराठी गाणी शिकवणे, काही अभिनयाशी छोटे छोटे उपक्रम देणे, आणि त्यानंतर एखादी गोष्ट मुलांना देऊन त्यावर अभिनय सादर करून दाखवणे आणि त्यातून आपण काय शिकलो हे सांगाणे. शिबिराच्या शेवटी शेवटी मुलांनाच सांगितले जायचे की स्वतःची एक गोष्ट तयार करून त्यावर अभिनय सादर करणे. त्यातून एक विधार्थी आपल्या बुद्धीच्या आधारावर व कल्पना शक्तीच्या जोरावर एक गोष्ट तयार करायला शिकत होता. आणि त्याच गोष्टीचे नाटकात सादरीकरण शिबिराच्या शेवटच्या दिवशी सादर करायला सांगितले जात असे. मुलांचे सादरीकरण पाहण्या करता त्यांचे आई-वडिल आवर्जून उपस्थित राहत. कधीही रंगभूमीवर न चढलेला आपल्या मुलाला रंगमंच्यावर पाहून त्यांचा आनंद द्विगुणीत होई.

या संस्थेत शिबिरांच्या वेळी असो अथवा अन्य कोणत्याही वेळी असो हंस ने कधीच कुठल्याच मुलाला कमी लेखला नाही. प्रत्येक मुलात काहीतरी करण्याची क्षमता असते एक नेतृत्व असते हे जाणलं. शिबिरात आलेला प्रत्येक विधार्थी हा रंगमंच कलाकार होईलच असे नाही. हे पक्के लक्षात ठेवूनच इथे मुलांना प्रशिक्षण दिले जात असे. अनेकदा या शिबिरातील किंवा कार्यशाळेत येणारी मुले ही आयुष्यात पहिल्यांदाच रंगमंचावर चढणारी असतात.

अभिनय कार्यशाळेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे

- या निवासी कार्यशाळेतून विद्यार्थ्याला आंगिक अभिनय, वाचिक अभिनय आणि आहार्य अभिनयाचे धडे दिले जात.
- एकदा विद्यार्थी स्वतःचे छोटेसे नाटक लेखन करत होता.
- स्पष्ट उच्चारण, संवादफेक, नेपथ्य, रंगमंचावरील हालचाली, तसेच रंगभूषा आणि त्या बद्दलची जाणीव.
- विशेष सांगयचे म्हणजे हंस ने गोवाभर जवळ जवळ पाहुणे तीनशे नाट्य कार्यशाळा घेतल्या.

- लहान मुलांच्या, मोठ्या मुलांच्या आणि त्याच बरोबर विशेष क्षमतेच्या मुलांसाठी देखील कार्यशाळा या संस्थेने घेतल्या.

हंस ने नाट्यकार्यशाळेतून गोव्यातील अनेक नाट्य कलाकार घडवले जे आज गोव्यात व गोव्याबाहेर एक उत्कृष्ट कलाकार म्हणून ओळखले जातात. त्यात अनेकांची नावे घेऊ शकतो. आदित्य जांभळे, दक्षा शिरोडकर, प्राजक्ता कवळेकर, मंदार जोग इत्यादी अनेक.

## • ३.३. रंगयात्रा

विजयकुमार नाईक यांनी एक उपक्रम राबवलेला तो म्हणजे रंगयात्रा. याच्या अंतर्गत होईल तितक्या कमी खर्चात गोव्यातील वेगवेगळ्या कॉलेजमध्ये व महाविद्यालयांना भेट देऊन तिथल्या मुलांसाठी नाटकाविषयीचे व साहित्याविषयीचे उपक्रम राबवले जात. या रंगयात्रेत गोव्यातील विविध भागांतील मुले सत्तरी ते वास्को आणि पेडणे ते काणकोण पर्यंत या उपक्रमात असत होती. या उपक्रमात भाग घेतलेली अनेक मुले गोव्याच्या मराठी रंगभूमीवर कार्यरत आहेत. रंगयात्रेचे काम विजयकुमार नाईक यांनी सातत्याने चालवले.

घरात गरिबीची परिस्थिती व कधीही नाटक न पाहिलेली अशा दुर्गम भागातील मुलांना घेऊन त्यांच्या बरोबर नाटक बसवून गोव्याबाहेर म्हणजे राजस्थान, बंगाल, महाराष्ट्र अशा विविध राज्यात जाऊन स्वतःच्या खर्चाने नाटकाचे प्रयोग सादर केले. कोणताही आर्थिक पाठिंबा नसताना हे गोव्यातील माणसाने करणे म्हणजे खरच उल्लेखनीय आहे.

## • ३.४. नाटक घरोघरी

कुठलेही नाटक सादर करण्यासाठी एक रंगमंच लगतो अथवा मोठ्ठी जागा लागते असे चित्र आपल्या सागळयांच्या डोक्यात अनेक वर्षापासून आहे. पण हंस थिएटर या संस्थेने ही पारंपरिक चौकट बाजूला ठेवून जिथे जागा मिळेल तिथे, मिळेल त्या जागेत नाटक करायचे असे ठरवले, कोणाच्याही घरात जाऊन त्या घरातील लोकांची परमिशन घेऊन, ते जी घरातील जागा देतील म्हणजे वासरी , बलकॉव इत्यादी ठिकाणी नाटकाचे सादरीकरण करायचे असा 'घरोघरी नाटक' हा उपक्रम होता.

## • ३.५. बॉक्स थिएटर (Box Theatre VTBT)

हंस थिएटर ने बॉक्स थिएटर सारखा एक नवखाच उपक्रम अनेक वर्ष राबवला. जर नाटक जाऊन पाहण्यासाठी वेळ नसेल तर आम्ही तुमच्या पर्यंत येतो असे म्हणून मोजक्या कलाकारांना घेऊन हा विजयकुमार नाईक यांनी वेगळाच उपक्रम राबवला. विविध गावात बॉक्स थिएटरच्या माध्यमातून नाटके सादर केली. बॉक्स थिएटर म्हणजे चालते फिरते थिएटर होय. कोणतेही नाटक जर सादर करणार असाल तर त्याला एक बैठक हवी असते, वातावरण हवे असते. त्यानुसार चालते फिरते बॉक्स थिएटर तयार करून घेतले होते.

यामध्ये नाटकाला लागणाऱ्या सगळ्या गोष्टींचा समावेश असायचा. उदा. प्रकाश योजना, पार्श्वसंगीत, प्रेक्षकांना बसण्यासाठीची जागा जवळ जवळ २०-१०० इतके प्रेक्षक एका वेळी नाटकाचा आस्वाद घेऊ शकतात इतकी सोय त्यात असायची.

बॉक्स थिएटर च्या माध्यमातून सादर केलेल्या अनेक नाटकांचे प्रयोग यशस्वी झालेले आहेत. या निर्मितीसाठी विजयकुमार नाईक यांच्या पत्नी ज्योती नाईक व सुपुत्र वरद नाईक यांनी त्यांना मदत केली. याच उपक्रमा अंतर्गत 'मी नाटकवाला' आणि 'बेलवरकरांचे स्वगत' ही दोन नाटके त्यांनी प्रभावीपणे सादर केली आणि लोकप्रियता देखील मिळवली.

या उपक्रमासाठी लोकांचा भरगोस असा प्रतिसाद मिळालेला आहे.

## • ३.६. Act One

Act One हा एक अभ्यासक्रम हंस ने चालू केलेला. अंदाजे २००८ ते २०१० या दरम्याने हा अभ्यासक्रम आयोजित केला होता. या उपक्रमात विदयार्थ्याला एक पार्श्वसंगीत दिले जात आणि त्यानुसार संवाद न वापरता अभिनय सादर करायचा. या उपक्रमात दिलेले पार्श्वसंगीत हे कशा प्रकारचे आहे हे जाणून घेऊन त्यानुसार एक कथानक तयार करायच आणि फक्त पार्श्वसंगीताच्या आधारावर अभिनय करायचा.

- या उपक्रमातून प्रशिक्षणार्थी आंगिक अभिनयची बांधणी करण्यास शिकतो.
- एखाद्या नाटकातील प्रसंगाला खुठ्ले पार्श्वसंगीत दिले तर ते योग्य ठरेल या बद्दलची जाणीव येते.

# निष्कर्ष

- ‘हंस थिएटर’ ही गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जोपासण्यासाठी सदैव कार्यरत असणारी नामवंत संस्था आहे.
- विश्वनाथ नाईक यांच्या पासून चालू झालेली संस्था आज या संस्थेची तिसरी पिढी तितक्याच उस्फुर्ततेने चालवत आहे.
- नाटक घरोघरी, शिका १०० मराठी गाणी अश्या वेगळया स्वरूपाच्या संकल्पना सुचवून त्या प्रत्यक्षात लोकांच्या समोर उभ्या करून प्रायोगिक रंगभूमीवर या संस्थेने आपला एक वेगळाच ठसा उमटवलेला आहे.
- या संस्थेने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून गोमंतकात अनेक नाट्य कलाकार घडले. जे आज मोठ्या पडदयावर वावरतांना दिसून येतात.
- अगदी साध्या पद्धतीने आजच्या नवीन मुलांना अनेक विषयां संदर्भात प्रबोधन करण्यासाठी या संस्थेने नाटक आणि अभिनयाचा हात धरलेला दिसून येतो.
- गोव्यातच नव्हे तर गोव्याबाहेर जाऊन नाट्य प्रयोग सादर केलेले आहेत.
- रंगयात्रा आणि बॉक्स थिएटर या सारखे उपक्रम अनोखेचव विशेष अशा स्वरूपाचे होते.
- नाटकात अथवा रंगभूमीवर काहीतरी बदल व सतत नवीन काहीतरी प्रयोग करून प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणे व नाटकांबद्दल आणि मराठी भाषेविषयी एक सकारात्मकता पसरवणे हेच संस्थेचे ध्येय होते आणि आहे हे आपल्याला अशा आयोजित केलेल्या उपक्रमांच्या माध्यमातून दिसून येते.
- नाट्यकार्यशाळांमध्ये फक्त अभिनयच न शिकवता नाट्य लेखन, दिग्दर्शन, पार्श्वसंगीत हे नाटकांशी संबंधित विषय देखील शिकवले जात असे. त्यामुळे अशा कार्यशाळेच्या माध्यमातून नाट्य लेखक, नाट्य दिग्दर्शक, नाट्य नेपथ्यकार असे नामवंत कलाकार घडले.
- काही विद्यार्थी आज आप-आपल्या गावात देखील नाट्य लेखन, नाट्य दिग्दर्शन इत्यादी अगदी सहजपणे करतांना दिसून येतात.

- वृशांक काणेकर, कौस्तुभ नाईक, प्रणेश गुरव, लौकिक देसाई, मंदार जोग इत्यादी अनेक नवे आपण घेऊ शकतो.
- उपक्रमांच्या माध्यमातून घडलेले विद्यार्थी आज राज्यस्तरीय स्पर्धा तसेच गोव्यात व गोव्याबाहेर इतर नाट्य स्पर्धामध्ये भाग घेऊन अभिनयाची, दिग्दर्शनासाठीची, नाट्यलेखनासाठीची बक्षीसे प्राप्त करतो.

**प्रकरण ४'हंस थिएटर' ने सादर केलेल्या निवडक नाटकांचे विश्लेषण**

## • ४.१. प्रस्तावना

'हंस थिएटर' या संस्थेने गेली अनेक वर्षे प्रायोगिक रंगभूमीला जोपासले. प्रायोगिक रंगभूमीचे बोट धरून अनेक नाटके रंगमंचावर सादर केली. गोव्यातील प्रायोगिक रंगभूमी समृद्ध करण्यासाठी या संस्थेचा विशेष हातभार आहे असे म्हंटले तर त्यात काही चुकीचे ठरणार नाही.

विश्वनाथ नाईक यांनी चालू केलेली संस्था पुढे विश्वनाथ यांच्या सुपुत्रांनी चालू ठेवली. या संस्थेने स्पर्धांच्या माध्यमातून म्हणा अथवा आवड म्हणून अनेक नाटके सादर केलेली आहे. सादर करत असतांना नेहमी त्यात काहीतरी नाविण्य आणण्याचा प्रयत्न या संस्थेने केलेला आहे.

'हंस थिएटर' या संस्थेने साकारलेल्या नाट्य प्रयोगांचा विवेचनात्मक अभ्यास.' असं शिर्षक दिलेल्या प्रकरणात हंस ने १९९५ ते २०१८ या दरम्यान सादर केलेल्या जुन्या व आजच्या निवडक नाटकांच्या प्रयोगाचे विवेचन करणार आहे.

या संस्थेतील नाटककारांच्या नाटकांचा व इतर बाह्य लेखकांनी लिहिलेल्या नाटकांचे विश्लेषण केले जाणार. नाटक सादर करत असतांना पारंपरिक चौकट मोडून नवीन कल्पनांचा वापर करुन नाटक यशस्वी कसे करावे हे या संस्थेकडून शिकावे. विवेचन करत असतांना नाट्य संहिता, आशय, अभिव्यक्ती तसेच इतर नाटकाचे घटक यावर भर दिली जाणार आहे.

## • ४.२. 'हंस थिएटर' ने सादर केलेल्या निवडक नाटकांचा आढावा / विश्लेषण.

हंस थिएटर या संस्थेने स्वातंत्र्योत्तरकाळा पासून रंगभूमीवर प्रवेश केला. वडिलांच्या नंतर त्यांच्या मुलांनी ही संस्था हाती घेऊन समृद्ध केली. विश्वनाथ नाईक यांच्या मुळेच ही संस्था प्रायोगिक रंगभूमीशी जुळली गेली आणि त्यानंतर प्रायोगिक मराठी रंगभूमी गोव्यात समृद्ध व विकसित करायच्या दिशेने वाटचाल करू लागली.

गोवा राज्यस्तरीय मराठी नाट्यस्पर्धांच्या माध्यमातून सादर केलेल्या नाटकांचा व विविध उपक्रमांच्या माध्यमातून केलेल्या निवडक नाटकांचा आढावा घेण्याचा प्रयत्न इथे करणार आहोत. आशय, अभिव्यक्ती व कथानकाची पार्श्वभूमी या संदर्भात इथे भाष्य करणार आहे.

हंस या संस्थेतील विजयकुमार नाईक, सोमनाथ नाईक, दिलीपकुमार नाईक, विष्णू वाघ कौस्तुभ नाईक इत्यादींनी नाट्य लेखन केलेले आहे. या सगळ्यांनी प्रभावी आणि नवीन धाटणीचे असे नाट्य लेखन केलेले आहे. त्यांची काही नाटके प्रकाशित आहेत तर काही नाटके अप्रकाशित आहेत.

या संस्थेतील नाटककारांनी जुन्या आद्य नाटककारांनी लिहिलेल्या जीर्ण झालेल्या संहिता पुन्हा एकदा लिहून काढून त्यांच्या नाटकांचे सादरीकरण व सर्जनशील वेगळ्या विषयाची व आशयाची नाटके लिहून ती प्रकाशित केलेली आहेत. यांनी लिहिलेल्या नाटकां मागच्या प्रेरणा या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांवर आधारलेल्या असतात. अनेक वेळा घरातच जेवणाच्या वेळी अथवा चहाच्या वेळी होणाऱ्या गप्पा गोष्टीच अनेक वेळा नाटकाची कथा म्हणून नवरुपास येत. तसेच वर्तमान पत्रकावर आलेल्या बातम्या नाटकांचे विषय होत आणि त्यातून एक नाट्यरचना निर्माण होत. घरात उठताना बसताना फक्त नाटकाच्याच गोष्टी होत असल्याने हे संपूर्ण हंस

कुटुंब नाट्यमय झालेलं आपल्याला दिसून येते. कुठलीही गोष्ट नजरेस आली की तीच नाट्यात रुपांतर झाले नाही तर नवलच म्हणावे लागेल.

या संस्थेतील लेखकांनी बालनाटके, एकांकिका, फार्सिकल नाटके, व्यावसायिक नाटके, प्रायोगिक नाटके , भाषांतरित नाटके, रुपांतरित नाटके नवीन म्हणजे मुकनाटके आपल्याकडे न रुजलेला असा नाट्यप्रकार लिहिलेला आहे.

या संस्थेने सादर केलेल्या जुन्या व नवीन नाटकांचे विवेचन खालीलप्रमाणे आहे.

- ## ४.२.१. 'निःशब्द बोलतांना'

'निःशब्द बोलतांना' हे विजयकुमार लिखित मूकनाटक होय. अशा मूकनाटकांचा प्रकार आपल्याकडे जास्ती रुजलेला नाही. मूक नाटक सांस्कृतिक महोत्सवात व महाविद्यालयीन नाट्य स्पर्धात सादर होणारे दहा ते पंधरा मिनिटांचे प्रयोग इतक्याच मर्यादेत ते गोमंतकात सादर होताना दिसतात.

विजयकुमार नाईक यांनी ही नाटके लिहीण्या मागे कारण म्हणजे नटाच्या आंगिक अभिनयातून शब्दांशिवाय अभिव्यक्त होण्याची क्षमता विकसित करण्यासाठी अथवा अभ्यासण्यासाठी मुकं नाटके लिहिली गेली.

जवळ जवळ ३० ते ४० मिनीटांपासून सव्वा दीड तासापर्यंतचा कालावधी असलेली एकूण दहा ते पंधरा नाटके लिहिली व या नाटकांचे यशस्वी प्रयोग देखील सादर केले.

या नाटकांना प्रेक्षकांचा विशेष असा प्रतिसाद मिळाला. त्याचबरोबर विजयकुमार नाईक यांचे रंगमित्र अभिनेता व् दिग्दर्शक विजय केंकरे ह्यानी मुंबईहून गोव्यात येऊन या नाटकांचे प्रयोग पाहिले व पाठीवर कौतुकाची थाप दिली.

तसेच भारताचे सुप्रसिद्ध मूकनाट्य अभिनेते व् प्रशिक्षक पद्मश्री निरंजन गोस्वामी यांनी या निःशब्द नाटकांना त्यांच्या राष्ट्रीय मूकनाट्य महोत्सवात आमंत्रित करून एक सन्मान प्राप्त करून दिला. त्याचबरोबर अशा मूकनाटकांचा संग्रह प्रकाशित करण्यास आग्रह केला.

पुढे 'निःशब्द बोलतांना' या मूकनाटकांचा संग्रहातील 'अद्वैत' हे मूकनाट्य सोडले तर त्यातील बाकी मूकनाटके मंचीत झालेली आहेत.

## • ४.२.२ लहान मुलांची नाटके

लमुना म्हणजे लहान मूलांची नाटके. दोनशेहून अधिक बाल नाट्यकार्यशाळा मध्ये सादर केलेल्या निवडक नऊ नाटकांचा 'लमुना' हा नाट्य संग्रह.

या पुस्तकातील 'पापड खाईन कुर्रम कुर्रम' हे नाटक आचार्य अत्रे ह्यांच्या 'सांडगे खाईन कुर्रम कुर्रम' या गोष्टीवरुन घेतलेले आहे. तसेच द. मा.मिरासदार यांच्या 'गाणारा मुलूख' ह्या नाटकावरुन विजयकुमार यांनी 'कुणाचा कायदा कुणाला फायदा' हे बालनाट्य लिहिले आहे.

अवतीभवती असणारी लहान मुले या नाट्यलेखानामागचे प्रेरणास्थान आहे. मूल्यांच्या बालनाट्यांच्या माध्यमातून व्यक्तिविकास होतो, मुलांनमध्ये आत्मविश्वास येतो आणि त्यांच बरोबर मुलांनमध्ये नाट्यकलेची जाणीव निर्माण होते. हाच विश्वास मनाशी ठेवून विजयकुमार नाईक यांनी बालनाटके लिहिली व मंचीत देखील केलेली आहे.

या बालनाटकांतून कथावस्तू मध्यवर्ती ठेवून आहार्य अभिनयाचे भान मुलांमध्ये निर्माण याचीही काळजी नाट्यसादरीकरणाच्या दरम्यान घेतलेली आहे. लहान मुलांसाठी सातत्याने आणि झोकून देऊन सकस काम करीत असलेल्यांमध्ये विजय कुमार यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

## • ४.२.३ अनारिसा

दिलीपकुमार नाईक यांच्या 'अनारिसा' या नाटकाच्या माध्यमातून आदिवासी जमातींचा समृध्द असलेला सांस्कृतिक वारसा, सामाजिक संकेत, जीवनमूल्ये यांचे दर्शन प्रकर्षाने समोर आणले होते. गोमंतकीयच नव्हे तर मराठी नाट्य रसिकांच्या आणि संशोधक अभ्यासकांच्या दृष्टीने दखल घेण्यासारखी बाब आहे. भारतातील आदिवासी जमातीचा इतिहास आणि संस्कृती संदर्भात आजपर्यंत जे लिखाण झालेल आहे ते अत्यल्प असून, त्यातल्या अपवादात्मक लिखाणाला वगळता आदिवासी जमातीच्या जीवनातल्या लोकसंकेतांचे आणि पारंपारिक मूल्यांचे चित्रण पहायला मिळणे कठीण झालेले आहे.

निसर्ग आणि पर्यावरण मूल्यांना आपल्या जीवनात आदिवासींनी महत्त्वाचे स्थान दिलेले असून, त्यांचा लोकधर्म, रितीरिवाज यातून त्यांच्या जगण्याचे पैलू दृष्टीस पडतात महानगर संस्कृतीपासून एकेकाळी दूर राहिलेल्या आदिवासींनी प्रतिकूल परिस्थितीत आपली संस्कृती टिकवली. डोंगराच्या, माळरानात वास्तव्य करणाऱ्या आदिवासींचे परंपरागत जीवन साधे आणि समाधानी होते. नैसर्गिक आनंदाने ते परिपूर्ण होते. त्या संदर्भात बरेच अज्ञान प्रचलित असताना लेखकाने त्यांच्या लोककला, सामाजिक धारणा, जीवनपद्धत आदीतल्या नाना विविध पैलूंचा बारकाईने अभ्यास करून त्यांचा आपल्या नाटकात यथोचितपणे उपयोग केलेला पहायला मिळतो.

अभ्यासपूर्ण असे हे नाट्यलेखन आहे. या नाटकाच्या माध्यमातून आदिवासी जमातीचा अभ्यास करून सत्व, रज आणि तम यांनी युक्त असलेले आणि विविध रसांनी युक्त अशा माणसांचे चित्रण या नाटकातून प्रदर्शित केलेला

आहे. या नाटकात गीते आलेली आहेत. अनारिसा या नाटकातील गीतांनी लोकगीतांची ऊंची गाठलेली आहेत. नाटकात पात्रांच्या तोंडी आलेली भाषा त्याचबरोबर समाजातील सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तीतला संघर्ष ह्या साऱ्याचे चित्रण दाखविण्यातच खरे लेखकाचे यश आहे.

## • ४.२.४. नाटक अहिल्योत्धार

हे नाटकगोमंतकाचे आद्य नाटककार संतकवी कृष्णंभट्ट बांदकर यांचे होय. या नाटकाची छायाप्रत स्व. शशिकांत नार्वेकर ह्यांनी विजयकुमार नाईक यांच्या हाती दिली.आणि हंस ने ते नाटक मंचीत करावे अशी आशा व्यक्त केली.अगदी धूसर अशा स्वरूपातली ही प्रत होती. लिखाणाची पद्धती एकटाकी त्यामुळे वाचणे कठीणच. काही काळ शुद्धप्रत शोधण्यात गेला दरम्यान शशिकांत नार्वेकर यांचे निधन झाले. पण प्रत्येक गोष्टीला मार्ग असतो आणि शेवटी असे कळले की बांदकरांचे कुटुंबीय फोंडयातच राहतात.

श्री सीताकांत बांदकर यांची मुलं विजयकुमार नाईक यांच्या ओळखीचीच या गोष्टीचा फायदा घेऊन विजकुमार जाऊन बांदकरांना भेटले, व अहिल्योत्धार या नाटकाच्या निर्मिती बद्दलची ईच्छा व्यक्त केली. त्यावेळी मोठ्या आनंदाने आणि विश्वासने बांदकरांनी अगदी दुर्मिळ हस्तलिखित प्रत विजयकुमार यांच्या हाती दिली. गोमंतकीय रंगभूमीचे अस्तित्व सिद्ध करणारा असा अमूल्य ठेवा विजयकुमार यांच्या हाती मिळाला होता.

त्यांनंतर संपूर्ण संहिता वाचण्याचा प्रयत्न चालू केला. पिवळा पडलेला कागद, फिकट झालेली शाई, व एकटाकी लेखन असल्यामुळे वाक्यरचना जुळवणे बरेच कठीण काम होते. तरीही प्रयत्न करून कच्चा खरडा तयार केला. या सागळ्या कामात त्यांच्याबरोबर हंस मधील एक युवक कलाकार मंदार जोग यांनी मदत केली.

त्यानंतर नाट्य निर्मिती करण्याचा निश्चय केला. यावेळी विजयकुमार नाईक यांचे बंधू दिलीपकुमार नाईक यांनी सातत्याने निर्मितीसाठीचा घोशा धरून ठेवला त्याचबरोबर सोमनाथ नाईक, रामनाथ नाईक यांच्या प्रोत्साहनामुळे या नाटकाची निर्मिती प्रक्रिया सुरु झाली.

या नाटकाचा अभ्यास करत असतांना लक्षात आलं ते म्हणजे या नाटकाला नांदी नाही, भरतवाक्य नाही, सूत्रधार नटी यांचा प्रवेश नाही. कुठल्याच नाटकांचा या नाटकावर प्रभाव नाही. हे नाटक कीर्तनाचा बाज घेऊनस्वतंत्रपणे संत बांदकरांनी लिहिलेलं आहे.

असे स्वतंत्र अस्तित्व असलेले नाटक आजच्या घडीला मंचीत करणे म्हणजे गोमंतकीय रंगकर्मींना अभिमान वाटला पाहिजे. स्वतः बांदकारांनी हे नाटक १८७० साली रामनवमीच्या निमित्ताने आपल्या राम मंदिरात सादर करण्यास सुरुवात केली. त्यामुळेच गोव्यात इतर भागात नाटके सुरु झाली. प्रसार प्रचार झाला आणि त्यामुळेच आज गोव्यात नाटक करू शकतो ह्याची जाणीव ठेवून विजयकुमार नाईक यांनी हे नाटक हाती घेतले.

या नाटकाच्या निर्मिती दरम्यान अनेक अडचणी आल्या. हे नाटक सादर कसे करावे या बद्दलची माहिती उपलब्ध नव्हती. या अडणीची मात सर्जनशीलतेला संधी देऊन केली. संगीताची जबाबदारी अजय नाईक यांनी स्वीकारली व साकी, दिंडी, आर्या यांचा समावेश असलेल्या या नाटकातील पदांना सुश्राव्य व भावानुरूप चाली लावून संगीताची एक वेगळीच उत्कटता वाढविली. मंदार जोग, सतीश गांवकर, किशोरी गावडे, सुदेश नाईक, सुदेश मुळगावकर, वृषांक काणेकर, रोहन नाईक, कौस्तुभ नाईक, त्रैल्योक्य जोशी व करुणा गावकर ह्या हंस थिएटर ट्रेनिंग सेंटरच्या मुलांनी प्रयत्नपूर्ण व परिश्रमांनी 'अहल्योत्धार' या नाटकाचे ५ डिसेंबर २००४ या दिवशी फोंडयातील राजीव गांधी कला मंदिर येथे मंचीत केला. त्यांनंतर महाराष्ट्रत या नाटकाचे अनेक प्रयोग सादर केले. गोव्यात व गोव्याबाहेर अनेक प्रयोग झाले व ह्या आद्य नाटकाच्या निर्मिती बद्दल कौतुकही झालं.

## • ४.२.५ थैंक्यू आजोबा

थेंक्यू आजोबा हे नाटक विजयकुमार नाईक यांनी लिहिलेले आहे. हे लिहीण्यामागचे कारण म्हणजे असे आहे की, नाट्यकार्यशाळांमुळे दरवर्षी शंभरहून अधिक युवकांशी भेटी गाठी होतात.त्यांच्या विचारांशी ओळख होण्याच्या प्रक्रियेतून मूलांची झालेली घुसमट दिसून येते. आईवडिलांच्या इच्छामुळे अनेकवेळा मुलांवर दबाव निर्माण करतात. आणि त्यावेळी मुलांना मनमोकळं बोलण्यासाठी कोणीतरी हवं असतं. त्यातून स्वतःला मोकळं करण्यासाठी जवळचं माणूस नसल्यावर अंतर्मन तुंबून राहतं. ते प्रवाहित होण्यासाठी आमच्यावेळी घरच्याघरी उपलब्ध असलेले आजी आजोबा नव्या करिअर संस्कृतीत कुठंतरी हरवले जात आहेत. अभ्यासाच्या बागुलबोव्यामुळे आजच्या पिढीला ह्या चैतन्यदायी नात्याला मुकावं लागतं. अर्थात सगळ्यांचीच ही स्थिती

नाही. पण ज्यांची आहे त्यांचं हे नाटक आहे. दुसऱ्या बाजूला नातवंडांच्या प्रेमाला आसुसलेले पण ज्या मुलांचे जीवन खुलविण्यासाठी आयुष्यभर खस्ता खाल्ल्या त्यांच्याच जीवनात अडगळीच्या स्थानी पडलेले आजीआजोबा. बांडगुळाच्या जीवनप्रक्रियेचा त्याग करून ही दोन्ही टोकं एकमेकांना पूरक ठरू शकतात. अशाच स्वप्नाचं हे नाटकाचे स्वरूप

थैंक्यू आजोबा या नाटकाचे प्रयोग हंस थिएटर तर्फे गोव्यात सादर करण्यात आले. अशा वेगळया धाटनीच्या नाटकाला लोकांचा भरभरुन प्रतिसाद देखील मिळाला.

या नाटकाचा पहिला प्रयोग 'हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर' फोंडा यांनी २००५ मध्ये राजीव गांधी कलामंदिर, फोंडा-गोवा येथे सादर केला. हे नाटक सादर करत असतांना रंगमंच्यावर फक्त दोन कलाकार. हे नाटक विजयकुमार नाईक यांनी दिग्दर्शित केले सोमनाथ नाईक यांनी गृहस्थाची भूमिका सांभाळली तर, मंदार जोग यांनी युवकाची भूमिका साकारली.

त्यांनंतर या नाटकाचे हिंदीत थैंक्यू दादाजी या नावाने भाषांतरीत व मंचीत देखील झालेले आहे.

## • ४.२.६ विजयकुमार लिखित एकांकिका

१९९५ ते २०१५ या कालखंडात हंस ने अनेक एकांकीका सादर केल्या. त्यात 'बिजी', 'डेथ ऑफ मर्सी', 'सरहद्दीवरची माणसं', इत्यादीं सारख्या एकांकिकांच्या लेखनातून आणि सादरीकरणातून एक वेगळेपणा दिसून येतो.

या नाटकांचे विषय म्हणजे आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटना, आणि त्या संबंधीच्या आपल्या प्रतिक्रिया, त्यांचं विश्लेषण, त्यावर होणाऱ्या समाज्यात चर्चा या सगळयाचा परिपाक म्हणजेच या एकांकिकांचा विषय होय.

या एकांकिकांच्या माध्यमातून सद्याच्या सामाजिक, आणि राजकीय स्थिती, आपले वैयक्तिक, आणि आंतरिक संबंध आणि ह्यातून निर्माण होणाऱ्या मानसिक, शारिरिक, सामाजिक, समस्यांना घेऊन हंस थिएटर ने एकांकीका सादर केल्या आहेत. या एकांकिका विविध शैलीतून सादर केलेल्या आहेत.

## • ४.२.७ रोम जळताना

विजय कुमार नाईक यांचे 'रोम जळतं होतं' हे नाटक. हे एकल नाट्य असून श्री. वसंत वरखेडकर ह्यांचं 'नीरो' ह्या नाटकावर आधारलेले आहे. 'नीरो' या नाटकातील सीझर नीरो या व्यक्तिमत्वाने स्वस्त बसू दिले नाही. या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न विजयकुमारांनी केला त्यावेळी त्यांना संदर्भग्रंथामध्ये नीरो बद्दलची माहिती मिळाली. आपल्या वडिलांची हत्या, आईची बेईनामी, पत्नीचा राजकीय हव्यासापासून सुंदर रोमनगरीचं स्वप्न ते त्यासाठी आत्माहुतीपर्यंतच्या त्यांच्या जीवन प्रवासातील प्रत्येक टप्प्यावरील त्याची मानसिक आंदोलनं या सगळ्याच चित्रण रोम जळताना या एकल नाट्यात दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हे एक एकल नाट्य असल्यामुळे अभिनयाच्या माध्यमातून जवळ जवळ दीड तास लोकांना बांधून ठेवणे, प्रेक्षकांसमोर अभिव्यक्त होणे कठीण काम असते. हेच आव्हान कोणी एक कलाकार स्वीकारायला तयार नव्हता त्यामुळे हे नाटक दीर्घकाळ पर्यंत मंचीत होऊ शकले नाही.

नंतर हंस थिएटरचा एक विद्यार्थी नितेश नाईक ह्यानी हे आव्हान नाट्याभ्यास म्हणून स्विकारले आणि पहिला प्रयोग मंचीत झाला. त्यानंतर हंस थिएटरचाच एक विद्यार्थी मंदार जोग ह्यांनी या एकल नाट्याचे जवळ जवळ नऊ प्रयोग सादर केले. गोव्याचे उत्तम नामवंत नट/ दिग्दर्शक श्री. राजू मेघश्याम नायक ह्यांनी नाटकाच्या प्रयोगाला उत्साहवर्धक दाद दिली.

आता ह्या नाटकाचे प्रयोग सादर होणे बंद झालेलेआणि त्यांनंतर पुस्तक प्रकाशित केले. स्वतः विजयकुमार नाईक यांच्याशी चर्चा करत असतांना म्हणाले की, "रोम जळत असताना ह्या नाटकाचे पुस्तक प्रकाशित करण्यामागे एक कारण म्हणजे पुढे भविष्यात हे एकल नाटय कुणीतरी वाचेल आणि त्यांच्याकडून नव्या संकल्पनेनं, नव्या पद्धतीने ह्या एकनाट्याचे मंचन होईल."

# ४.२.८. अर्यमा उवाच

सोमनाथ नाईक यांचे 'अर्यमा उवाच' हे रामायणातील एका स्त्री भूमिकेवर आधारलेले नाटक होय. हे नाटक कै. डॉ. तारा वनारसे ह्यांच्या 'श्यामिनी' ह्या कादंबरीवर आधारलेले आहे. या नाटकाचा प्रयोग २६ डिसेंबर २०१२ साली दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह, पणजी येथे झाला.

या नाटकात श्यामिनी म्हणजेच शुर्पणखेची वेदना सांगितलेली आहे. या नाटकातून लेखकाने रामसीता यांची उदात्तता वर्णन अथवा शुर्पनखेविषयी सहानुभूती देखील निमार्ण केलेली नाही. तर मात्र आजच्या वैज्ञानिक युगात वास्तववादी दृष्टिकोनातून विचार करताना स्त्रिसुलभ भाव अथवा संवेदना, जाणिवा, भोग त्याग, द्वेष, वेदना, आकर्षण आसक्ती, या संदर्भात विचार करायला प्रवृत्त करणारे नाटक आहे. मनोरंजना बरोबरच समाज प्रबोधन झालेले आहे. या नाटकात लेखकाने संस्कृत- प्राकृत संवाद, काव्यात्मक भाषाशैली, लोकनाट्याशी मिळणार आकृतीबंध, व निवेदनातील वैविध्य अशा वैशिष्टयामुळेच हे नाटक ऊंची गाठते.

# • ४.३ हंस या संस्थेच विशेष

'हंस थिएटर' या संस्थेचे नाटकांच्या संदर्भात विशेष सांगायचे झाले तर अनेक आहे. त्यातील काही माझ्या अभ्यासाच्या वेळी लक्षात आल्या त्या खालील प्रमाणे आहे.

- नाटकांचा आशय हा दानैदिन जीवनातला असतो. आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी नाटकांच्या माध्यमातून मंचीत होतात.
- हंस संस्थेतील नाटककार संशोधनात्मक व अभ्यासपूर्ण नाट्य लेखन करतात.
- सामाजिक, पौराणिक, तसेच स्त्री विषयक नाटकांचे लेखन केलेले आहे.
- हंस संस्थेतील नाटककार साध्या सरळ व सोप्या भाषेत लेखन कार्य करतात.
- रंगभूमीवर सतत काहीतरी नवीन घेऊन येण्याचे त्यांचे प्रयत्न असतात.
- त्यांच्या लेखनातून वाचकाच्या ठिकाणी देखील भाषिक संस्कार घडतात.

- या संस्थेच्या नाटकाच्या तालमी ह्या शिस्त प्रिय असतात. शिस्त म्हणत असतांना त्यात क्लिष्ट असं काहिच नाही. उदा. तालमीच्या ठिकाणी आल्यावर आपल्या पायातील चप्पल रेषेत ठेवणे, नाटकाची तालीम चालू असतांना अन्य विषय न करता नाटकावर लक्ष ठेवणे.
- तालमी नंतर मिळेल त्या वेळेत नाटकासाठी लागणारी वेशभूषा स्वतः करणे. या मागील उद्देश म्हणजे कलाकारांना रंगभूषे बद्दलचे भान येण्यासाठी.
- तसेच नाटकाचे नेप्थ्य आणि पार्श्वसंगीत आणि प्रकाशयोजना हेही संस्थेतीलच लोकांकडून करवून घेतले जात. त्यामुळे कलाकाराला याबद्दलचे देखील भान येते.
- या संस्थेने रंगमंचावरील रंगभूषेत देखील बदल केलेले आहे. झगमगीत कपडे घालून सादर केली जाणारी नाटके अगदी सुटसुटीत कपडे घालुन आपले पात्र सादर करणे . हे त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य होय.

# ● निष्कर्ष

- या प्रकरणात 'हंस' या संस्थेने १९९५ ते २०१५ या कालखंडात सादर केलेल्या नाटकांचे विश्लेषण केलेले आहे.
- निवडक नाटकांचाच अभ्यास केलेला आहे.
- या संस्थेच्या लेखकांच्या नाट्यलेखना मागच्या प्रेरणा ह्या दैनंदिन जीवनातीलच प्रामुख्याने दिसून येतात. सोमनाथ नाईक यांनी अगदी अभ्यासपूर्ण नाटके लिहिलेली आहेत.
- विजयकुमार नाईक यांनी नाटकांच्या माध्यमातून वेगवेगळे विषय हाताळलेले आहेत. नाटकांचे विविविध प्रकार देखील त्यांनी लिहिलेले आहे.
- विजयकुमार, सोमनाथ, रवींद्र, दिलीपकुमार हे गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमीसाठी लाभलेले अतुलनीय असे लेखक,नट, दिग्दर्शक आहेत.
- ही नाटके सादर करत असतांना नाट्यमंचावर अनेक बदल नाट्यतंत्रात त्यांनी घडवून आणले.
- फक्त पार्श्वासंगीताच्या आधारावर अभिनयातून कथानक प्रेक्षकापर्यंत पोहचवणे आणि त्यातून देखील एक योग्य तो आशय पोहचवणे हे अगदी नेमकेपणाने केले.
- हंस संस्थेच्या तिसऱ्या पिढीतील कौस्तुभ, रोहन, वृशांक यांनी देखील नाटके लिहिली आणि दिग्दर्शित देखील केलेली आहे.
- नवीन धाटणीची नाटके लिहून ती मंचीत करणे आज सोपे आहे. पण जुन्या नाटकांचा शोध घेऊन, त्या नाटकांचा अभ्यास करून मग ते नाटक मंचीत करणे कठीण असते आणि हेच या संस्थेने संपूर्ण समाजाला सिद्ध करून दाखवलेले आहे.

# प्रकरण ५ : समारोप आणि निष्कर्ष

## • प्रस्तावना

समारोप आणि निष्कर्ष हे या संशोधन प्रबंधीकेचे पाचवे प्रकरण होय. या प्रकरणात एकूणच संशोधन प्रबंधीकेचा आढावा घेऊन निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. हंस थिएटर ही संस्था स्वातंत्र्योत्तर काळापासून विकसित कशी होत गेली आणि प्रायोगिक नाटकांचा वारसा कसा जोपासला आणि समृद्ध केला हे ह्या संपूर्ण प्रबंधीकेतून मांडण्यात आलेले आहे. समारोप आणि निष्कर्ष खालील प्रमाणे.

## • समारोप

गोमंतकीय मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणारे 'हंस थिएटर' असं शीर्षक दिलेल्या प्रबंधिकेच्या अंतर्गत मी गोमंतकातील प्रायोगिक रंगभूमी टिकवून ठेवणाऱ्या एका संस्थे विषयी चौफेर माहिती एकत्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

पहिल्या प्रकरणात भारतीय नाट्याच्या उत्पत्ती बद्दल आणि वर्णन केलेल्या दंत कथेचा उल्लेख या प्रकरणात केलेला आहे. या प्रकरणात थोडक्यात नाटक या साहित्यप्रकाराची सैद्धान्तिक मांडणी मांडलेली आहे. त्यात नाटकाची वैशिष्ट्ये सांगून, नाटकाचा इतिहास कालखंडानुसार अभ्यासलेला आहे.

१९८३ ते आजपर्यंतचा एकूणच इतिहास या प्रकरणात अभ्यासलेला आहे. या कालखंडात आलेले विविध प्रवाह ऐतिहासीक नाटके, पौराणिक नाटके, संगीत नाटके, तसेच बुकिश नाटके यांचा थोडक्यात उहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठी गोमंतकीय नाट्य परंपरा अभ्यासून आद्य नाटकारांविषयी नमूद करून एकंदरित गोमंतकीय नाटकांचा आढावा घेतलेला आहे. आणि भारतीय मराठी रंगभूमीच्या परिप्रेक्ष्यात गोमंतकीय रंगभूमी कशी वेगळी आहे हे सांगितलेले आहे.

मराठी रंगभूमीचे आद्य नाटककार म्हणून आपण विष्णुदास भावे यांचा उल्लेख करतो पण त्यांच्याही पूर्वी पासून गोमंतकात मराठी नाट्यपरंपरा रुजू झाली होती ती म्हणजे कृष्णंभट्ट बांदकर यांच्या नाट्यलेखनातून.

स्थानिक मंदिरे, मांड इत्यादी धार्मिक संस्थांच्या मदतीने काला, जत्रा, जागोर, खेळ, दशावतारी नाटक इत्यादी वेगवेगळया नाट्यप्रकारांनी गोमंतकाची हौशी रंगभूमी समृद्ध झालेली आहे. गोमंतकाची नाट्यपरंपरा ही अशी गौरवशाली आहे. ती स्वयंभू आहे- स्वयंमेव आहे- स्वसंवेद्य आहे.

त्यानंतर मराठी प्रायोगिक रंगभूमीचा वारसा व गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमी विषयी अभ्यास केला. गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमी ही आपल्याला नाट्यस्पर्धांच्या माध्यमातून अधिक प्रमाणात दिसून येते. नाट्यस्पर्धांमध्ये अनेक नाट्यसंस्था रंगभूमीवर विविध प्रयोग करताना चित्रित होतात. परंपरा सोडून नवीन गोष्टी आत्मसात करणारी नाटके स्पर्धांच्या माध्यमातून सादर होऊ लागली.

नाट्यस्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या अनेक संस्था स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झाल्या त्यात अनेक जुन्या नव्या संस्थांच्या उल्लेख आपण करू शकतो. रुद्रेश्वर, कला शुक्लन्दु, मराठी भाषा परिषद, गोमंत विद्या निकेतन इत्यादी अनेक संस्था प्रायोगिक रंगभूमीसाठी कार्यरत आहेत. अशा एक संस्थेचा अभ्यास त्यांची वैशिष्टये आणि ट्या संस्थेची पार्श्वभूमी अभ्यासणार आहे. प्रायोगिक रंगभूमीचा वारसा कायम जोपासत ही संस्था आज कुठपर्यंत वाटचाल करते आहे या संदर्भात थोडक्यात जाणून घेतलेले आहे.

गोव्यातील अंत्रुज महालात स्थापीत झालेली संस्था म्हणजे 'हंस संगीत नाट्यमंडळी' होय. १९५० साली फोंड्यातील छोट्याशा गावात वारखंडे येथे अगदी चौदा- पंधरा या कोवळया वयात विश्वनाथ नाईक यांनी आपल्या बरोबरच्या मुलांना घेऊन 'हंस संगीत नाटयमंडळी' असे सोबर नेवः देऊन स्वतःची अशी व स्वतःच्या हक्काची संस्था स्थापन केली. ही संस्था स्थापन होण्यामाह एक कथा सांगितली जाते.

एकदा झालेला अपमान एक आव्हाहन म्हणून स्वीकारुन स्थापन केलेली ही संस्था आज देशात नामवंत आहे. एक दर्जेदार नाट्य संस्था म्हणून उल्लेख केला जातो.

साथी सवंगडींना घेऊन हनुमान मंदिराच्या मंचावर 'लवांकुश' हे पहिल्यांदा नाटक सादर करून या संस्थेची मुहूर्तमेड रोवली. नाटकासाठी मिळेल ती माणसे घेऊन अनेक नाटके सादर केली. विश्वनाथ नाईक यांनी गोमंतकात मराठी नाटकांचा प्रसार आणि प्रचार अगदी लहान वयापासून सुरु केला आणि आजन्म तो चालूच ठेवला. मराठी भाषा आणि संस्कृती या विषयी असलेलं प्रेम सतत त्यांच्या केलेल्या कामगीरीच्या आढाव्यातून दिसून येते.

विश्वनाथ नाईक एकदा मुंबईला गेले असता त्यांनी 'वोटिंग फॉर गोदो' या प्रायोगिक नाटकाचा प्रयोग बघण्याचा योग त्यांना येतो. ते प्रायोगिक नाटक त्यांना काहीच कळलं नाही. पण त्या नाटकांने त्यांना दोन तास खेळवून ठेवलं. आणि त्यानंतर त्यांच्या डोक्यात सतत ते नाटक खेळत होते.

विश्वनाथ यांना त्या नाटकानंतर कायम दिसते होते की, आपल्या संस्थेचा असा विकासात्मक प्रचार प्रसार व्हायचा असेल तर नवीन प्रवाहाची ओळख करून घेणे गररजेचे आहे.

गोव्याबाहेर जाऊन नाव कमावलेले दिग्दर्शक बोरकर यांना बोलावून त्यांनी पुढच्या पिढीला प्रायोगिक नाटकांचे महत्त्व आणि ओढ लाऊन दिली. 'गणपत वाणी' आणि अशाच तीन-चार प्रयोगिक स्वरूपाची नाटके बसवून मंचीत देखील करवून घेतली. विश्वनाथ नाईक यांच्या बरोबर सूर्या वाघ, एनएसडीतून उत्तीर्ण झालेले शिवदास घोडके, शांताराम नाईक, गुलाब मंगेशकर, शशिकला नागेशकर, अलका वेलिंगकर पुरुष व स्त्री इत्यादी नामवंत कलाकार होते.

घरात सतत नाटकांच्या तालमी चालू असल्यामुळे, घरात अन्य विषय कोणते टिकतच न्हवते त्यामुळे घरातील मूल्यांच्या कानावर फक्त आणि फक्त नाटकांचेच विषय त्यामुळेच या सगळयातून पुढील पिढी घडत होती नव्या नाटकांकडे वळत होती. नाटक आणि नाटकसंदर्भात प्रचार व प्रसार करण्यासाठी नवीन युवकांना तयार करत. वेगवेगळे गोव्याबाहेरील मार्गदर्शकांना संस्थेचा भाग बनवून नवीन मुलांना नाटकाच्या नव्या दिशा दाखवण्याचे कार्य ते सातत्याने करत असे. त्यामुळे अगदी सहजपणे नवीन पिढी घडत गेली. नवीन कलाकार विद्वान नाटकरांच्या मार्गदर्शनात घडले आणि आज हे कलाकार आजच्या पिढीला घडवतांना दिसून येतात. नाटकाकडे अगदी विचारात्मक आणि सर्वांगीण नजरेने बघणे गरजेचे असते हे दाखवून देत त्यांनी हंस ची जबाबदारी नकळतपणे आणि कोणतीही अपेक्षा न ठेवता आपल्या मुलांकडे सोपवली.

त्यानंतर हंस संस्थेचे कार्य विश्वनाथ यांच्या मुलांनी हाती घेतले. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली घडलेली ही पिढी सुद्धा नाटकाकडे तितक्याच गंभीरपणे सांभाळली व आणखी वृद्धिगत केली.

संस्थेच्या दुसऱ्या पिढीतील नाट्यप्रेमी म्हणजे सोमनाथ, रवींद्र, दिलीपकुमार, विजयकुमार होय. यांचे संपूर्ण बालपण नाटकात गेल्यामुळे नाटकाबद्दलची विशेष ओढ त्यांना लागली होती. स्वतःच शिक्षण सांभाळत, नाट्य संस्था देखील सांभाळली.

दुसऱ्या पिढीने जुने नाट्य प्रवाह म्हणजे ऐतिहासिक, व्यावसायिक, पौराणिक, संगीत नाट्य यांच्याबरोबर नवीन प्रवाहातील नाटके म्हणजेच प्रयोगिक नाटके देखील सादर केली. प्रयोगिक रंगभूमीचा जनमानसात प्रचार प्रसार करण्यासाठी हंस ने अहर्निष प्रयत्न केले आणि त्या प्रयत्नांनी त्याना हवे तसे फलित देखील बहाल केलेले आहे.

सातत्याने नाट्य संबंधित विविध प्रयोग करून नाटक नव्याने कसे सादर करू शकतो याबद्दलचा अभ्यासुवृत्तीने चिकित्सा करून नाट्य प्रयोग सादर केले. प्रयोग म्हणत असतांना फक्त अभिनयात फेरफार न करता पार्श्वसंगीत, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा इत्यादींच्या बाबतीत देखील या संस्थेने प्रयोग करून बघितलेले आहेत.

विजयकुमार नाईक यांनी अनेक नाट्यकार्यशाळा, बॉक्स थिएटर, घरोघरी नाटक असे अनेकविध नाट्य उपक्रम राबवले आणि त्यातून पुढची पिढी घडवली. अंदाजे १९८८पासून ते  २०१५ पर्यंत संपूर्ण गोवाभर  विजयकुमार नाईक यांनी कार्यशाळा आयोजित केल्या व भावी पिढीला नाटकाचे नवे स्वरुप दाखवून दिले

याच दरम्यान नकळतपणे हंसची तिसरी पिढी उदयास आली आणि हळू हळू नाटकांची सुत्रे हाती घेतली. गोव्यात प्रायोगिक नाट्य चळवळ राबविण्यात विजयकुमार नाईक यांचा मोठा वाटा आहे. आनंद काणेकर, अनिल मोडक, अजित केरकर, नितीन कोलवेकर, जितेंद्र पारकर, गोविंद बागकर, बिपीन मंगेशकर, सिंथीया परब, अजित कामत ते आत्ताच्या पिढीतले एकनाथ नाईक, प्रियांका बिडीये तालक, मंदार जोग, सतीश गावकर, नितेश नाईक आदी कलाकार हंसच्या माध्यमातून घडले आहेत. चंद्रकांत नाईक, किरण नाईक, यांच्यासारखे नेपथ्यकार, अजय नाईक, नरेंद्र नाईक, कोळंबीकर यांच्यासारखे संगीतकार,एकनाथ नाईक, प्रदीप गोवेकर यांच्यासारखे रंगभूषाकार हंसनेच घडविले. हंस संगीत नाट्यसंस्थेचे शिवधनुष्य आज तिसऱ्या पिढीने पेलले आहे.

ही पिढी संस्थेला प्रयोगिक रंगभूमीकडून इंटेलेक्चुअल पातळीवर नेण्याच्या प्रयत्नात आहे. तिसऱ्या पिढीतील कौस्तुभ नाईक आणि रोहन नाईक यांनी नाट्य  लेखन नाट्य दिग्दर्शन केलेले आहे.

एकूणच विविध धाटनीची नाटके या संस्थेने स्थापनेकाळापासून सादर केलेली आहे. हंस या संस्थेच्या माध्यमातून नाट्यकलेचे नानाविध प्रयोग चालूच असतात.   त्यामुळे हंस आपल्या तीन पिढ्यातून सजग प्रेक्षक तयार करण्यासाठी वर्षानुवर्षे सक्रिय आहेच आणि त्याचबरोबर प्रयोगिक रंगभूमीचा वारसा जपण्यासाठी सदैव कार्यरत होती आणि कार्यरत असणार.

## ● निष्कर्ष:

- भारतीय रंगभूमी जवळपास दोन हजार वर्षांपूर्वीची आहे. तत्पूर्वी म्हणजे अर्वाचिन कालखंडात लोकरंगभूमी आणि लोककलाप्रकार, त्या त्या प्रादेशिक पातळीवर सादर केले जात होते.
- मराठी रंगभूमीची सुरुवात १८४३ साली विष्णुदास भावे यांच्यापासून झाली, असे मानले जात असले तरी रंगभूमीचे बीज लोकरंगभूमीचा प्रवाह, संस्कृत रंगभूमी आणि तंजावरी नाटकांचा प्रवाह यात रोवले गेलेले आहे.
- मराठी रंगभूमीच्या सुरुवातीपासून ते १९२० साला पर्यंतच्या कालखंडाचा विचार केल्यावर असे लक्षात येते की, संस्कृत, इंग्रजी नाट्यकृतीचा त्याचबरोबर पारशी, उर्दू रंगभूमीचा परिणाम मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो.
- कळसूत्री बाहुल्यांचा खेळ, लळीते, दशावतारी नाटके, इत्यादी लोकनाट्य परंपरेतून मराठी नाटकांचा उदय व विकास झालेला आहे.
- विष्णुदास भावे यांच्या नाटकांपासून आधुनिक मराठी नाटक समृद्ध झालेले आपल्या लक्षात येते.
- संस्कृत आणि इंग्रजी नाटकांचा आधार घेऊन विपुल मराठी नाट्यनिर्मिती होऊ लागली.
- किर्लोस्करांनी संगीत नाटकाला समृद्ध बनवण्यासाठी विशेष प्रयत्न व प्रभावी अशी कामगिरी दर्शविलेली आहे.
- इ.स. १८७५- १८८८५ या काळात किर्लोस्करांनी मराठी नाट्यसृष्टीला वेगळी प्रतिष्ठा प्राप्त करवून दिली. त्यामुळेच या काळात अनेक नानाट्य मंडळया व उत्तम नटांची संख्या वाढलेली आहे.
- सुरुवातीची नाटके बहुधा लोकरंजनाच्या उद्देशाने निर्माण झाली. पण नंतरच्या काळात लोकरंजनाबरोबर लोकक्षिक्षण व लोकजागृती या उद्देशाने नाट्य निर्मिती होऊ लागली.
- समाजसुधारणा, स्त्री समस्या यांन सारखे विषय आणि विचार नाटकांतून होऊ लागले.

- या काळाच्या उत्तरार्धात समता, प्रेम, लोकजागृती, समाजसुधारणा, स्त्री, या विषया बरोबर राजकर्त्यांच्या विरोधात द्वेष भावना निर्माण करणारी नाटके लिहिली गेली.
- कोल्हटकर, गडकरी,  ह्यांची नाटके लोकशिक्षण व प्रबोधन या उद्देशाने उदयास आली असे चित्रित होते.
- आचार्य अत्रे, खाडिलकर, गडकरी, रांगणेकर, या नाटककारांनी आपापल्या लेखन कालखंडात नाट्य लेखन करून नाट्यवैभव विशाल करण्यासाठी विशेष हातभार दर्शविलेला आहे.
- पौराणिक नाटकांनी, ऐतिहासिक नाटकांनी, सामाजिक नाटकांनी नाटक या साहित्यप्रकाराला तेज प्राप्त करून दिले.
- कथा रचनेपेक्षा व्यक्तिदर्शनावर अधिक भर देण्यात आली.
- नाटकातील कल्पनारम्यता आणि अद्भूतता कमी होऊन वास्तवाला अधिक महत्व प्राप्त झालेले दिसून येते.
- स्वातंत्रोत्तर कालखंडात आपल्या भारतीय मराठी नाटकांनी सामाजिक वास्तवाचा कलात्मक आविष्कार घडविला.
- सामजिक समस्या व विषय लोकांच्या समोर मांडून एकूणच समाजात बदल घडवण्याचे काम या काळात खूप झाल्याचे दिसून येते.
- स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय मराठी रंगभूमीवर अधिक प्रमाणात नाटक लेखन व नाटकांची निर्मिती झालेल्याचे दिसून येते.
- या काळात दलित रंगभूमी, कामगार रंगभूमी, बाल रंगभूमीसारखे प्रवाह निर्माण झाले.
- वि.वा.शिरवाडकर, कानेटकर, तेंडूलकर इत्यादी नाटकाकरांनी जीवनविषयक विविध जाणिवांचे चित्रण नाटकाच्या माध्यमातून घडविले.
- पौराणिक ऐतिहासिक विषयांपेक्षा वास्तवाला हात घालणारी व वास्तवतेला चिकटून असणारे विषय आले.
- संगीत नाटकांचे प्रमाण खूपच कमी झालेले दिसून आले.
- स्वातंत्रोत्तर कालखंडात नाटकातील आशय, अभिव्यक्ती, तंत्र, प्रयोग याबाबतीत नवनवीन प्रयोग केले.

- मराठी नाटके देशपातळीवर पोचू लागली व स्वतःची नवी ओळख व स्वतःची एक नवी छाप निर्माण केली.
- स्वातंत्र्योत्तर काळात मराठी रंगभूमीवर व्यावसायिक आणि प्रायोगिक या दोहोचा प्रवाह दिसून येतो.
- फार्सिकल नाटक, एकांकिका यांनी मराठी रंगभूमीचे क्षेत्र व्यापक केले.
- स्त्री व पुरुष यांच्यातील संबंधाचे वास्तव, भडक, विकृत असे चित्रण आजच्या नवीन नाटकात जाणवते.
- 'गिधाडे', सखाराम बाइंडर', 'वासनाकांड', 'घाशिराम कोतवाल', इत्यादी नाटके वेगळ्या शैलीतून भारतीय मराठी रंगभूमीवर गाजलेली आहे.
- राज्यनाट्य स्पर्धा, प्रबंध लेखन यामुळे मराठी रंगभूमीचा विकासात्मक बदल आणि नाटक या विषयाकडे बघण्याचा दृष्टीकोनात बदल होतांना दिसत आहेत.
- आधुनिक काळात नाट्यसंस्था, नाटककार, तंत्रज्ञ, यांनी विविध व नवनवीन प्रयोग करून रसिक प्रेक्षकांना नवीन कलेचा आस्वाद मिळवून दिला.
- स्वातंत्र्योत्तर काळात मराठी रंगभूमीवर नवीन कल्पना, नवीन आशय व अभिव्यक्ती यांचा उपयोग झाल्यामुळे आपोआपच रंगभूमीचे स्वरूप प्रगत व व्यापक झाल्याचे दिसते.
- भारतीय रंगभूमीच्या परिप्रेक्ष्यात गोमंतकीय रंगभूमीचा वेगळेपणा दिसून येतो.
- गोमंतकीय मराठी रंगभूमी ही स्वयंभू असलेल्याचे जाणवते.
- मराठी गोमंतकीय नाटक गद्य-पद्य लिखित स्वरुपात १८१८ साला पासून अस्तित्वात असलेल्याचे पुरावे कागदोपत्री बघायला मिळतात.
- विष्णुदास भावे यांना प्रामुख्याने आद्य मराठी नाटककार मानत असले तरी गोमंतकात भावेच्यापूर्वी पंचवीस वर्षे खेडेगावांतून दशावतारी नाटकांचे प्रोयोग सादर होत.
- गोमंतकीय नाट्य-परंपरा फार प्राचीन आहे. गोमंतकीय आद्य कवी कृष्णदास शामा यांनी आपल्या "श्रीकृष्ण चरित्र कथा" या आपल्या ग्रंथात म्हटले आहे, "जैसा का नटधर, तैसे रंगामाजी दोघे वीर । वस्त्र भुषणे, अलंकार । शोभते झाले ।" यावरून या काळात गोमंतकात नाटक हा प्रकार फार प्रचलित होता असे म्हणता येईल.

- गोमंतकातील लोकनाट्याचा विचार करता जागर,काला, रणमाले, लळीत, त्राटिका, पुतना, विरभद्र अशासारखे नाट्यप्रकार गोव्याच्या रंगभूमीवर फार प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेले जाणवतात. तत्कालीन

- समाजाला मनोरंजनाबरोबर भक्तीबोध करण्यासाठी रामायण, महाभारत किंवा भागवती कथा समजावून देऊन त्यांना धर्मतीतिप्रवण करणे हा त्या मागचा हेतू दिसतो. ह्या पार्श्वभूमीवर गोमंतकामध्ये जे अनेक संत निर्माण झाले त्याचा प्रामुख्याने उल्लेख करता येतो. ते म्हणजे संत सोहिरोबानाथ आंबिये व संत कृष्णंभट बांदकर.

- गोमंतकातील डोंगरी गावचे सुपुत्र कृष्णंभट बांदकर यांनी संवाद रुपात व गाणी असलेली पौराणिक आशयाची नाटके सादर केली.

- 'शुकरंभा संवाद', 'लोपामुद्र', 'नट सुभद्राविलास', आणि 'अहल्योत्धार' ही एकूण चार नाटके संत कवी नाटककार कृष्णंभट बांदकर ह्याची आहेत.

- कृष्णंभट बांदकर ह्यांच्या प्रेरणेने अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'सं. शाकुंतल' हे नाटक १८८० साली पुण्यात रंगभूमीवर आणले.

- गोमंतकात देवादिकांच्या उत्सव प्रसंगी नाटके सादर करण्याची प्रथा व परंपरा पुरातनकाळापासून चालत आलेली दिसून येते.

- वंशपरंपरागत देवाची सेवा करण्याची प्रथा अजूनही गोव्यात आहे. 'पेरणी जागर' हा जागर प्रकार प्रेरणी आडनावाच्या कुटुंबियांकडून अजूनही 'पेरणी जागर' या नावाने लोककला प्रकार म्हणून प्रस्तुत केला जातो.

- गोमंतकीय नाट्य साहित्याच्या परंपरेत मो.ग. रांगणेकर, ह. वि. देसाई व बबन प्रभू ह्यांनी भर घातलेली आहे.

- जोत्स्ना भोळे, हिराबाई पेडणेकर, सोनाबाई केरकर ह्या गोमंतकीय स्त्री नाटककार आहेत.

- उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण गोव्यात एकोणविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सुमारे आठशे ते नऊशे नाटकाचे प्रयोग सादर केले जात असत.

- गोमंतकीय वेगळेपण सांगयचे म्हणजे पणजी, मडगाव, म्हापसा, धारगळ या ठिकाणी उत्सवा निमित्त अनेक नाटके सादर केली जात. रंगमंचावर ट्रीकसीन करून देवादिकांचे चमत्कार दाखवीत असत तसेच रथासारखा रंगमंच तयार करून तो नाटकांच्या ठिकाणी नेऊन त्या रथासारख्या रंगमंचावर नाटक सादर केले जात असत. अशा रंगमंचावर वासुदेव नाटेकर ह्यांनी रंगविलेले पडदे लावून संपूर्ण नाटक मंचीत केले जात असे.
- गोमंतकात या काळात अनेक नाट्यसंस्था स्थापित केल्या गेल्या.
- १८३१ साली ‘श्री रामनाथ दामोदर प्रासादिक दैवज्ञ नाट्य मंडळ’ ही सर्वात प्रथम स्थापित झालेली संस्था आहे.
- त्यानंतर १८३१ ते १९१९ या दरम्यान पर्वतकर नाटक मंडळी, कळंगुटकर संगीत नाटक मंडळी, गोवा संगीत नाटक मंडळी, गोवेकर स्त्री नाटक मंडळी, ललितप्रभा संगीत नाटक मंडळी, नाट्यनिकेतन, श्री कालिका कला मंडळ इत्यादी अनेक गोमंतकीय नाट्य संस्था स्थापित केल्या गेल्या.
- या संस्थांच्या माध्यमातून अनेक नाटके, अनेक कलाकार घडले.
- गोव्यातील उत्सवी व हौशी रंगभूमी ते व्यावसायिक रंगभूमीवर झळकलेले कलाकारांत मा.दिनानाथ, रघुवीर सावकार, मा. दत्ताराम, भिकू पै आंगले, दामू केंक्रे, केसरबाई बांदोडकर, मीनाक्षी शिरोडकर, शालिनी म्हार्दोळकर, मनोरमा वागळे इत्यादींची नावे उल्लेखनीय आहेत. या नामवंत कलाकारांनी गोमंतकीय मराठी रंगभूमी आपल्या अभिनयाने व कला आविष्काराने गाजवून सोडली.
- गोमंतकीय नामवंत नाटककार विश्वनाथ नाईक ह्यांनी १९५० साली ‘हंस संगीत नाट्य मंडळी’ या नावाने एक संस्था स्थापन केली.
- वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी स्थापन केलेल्या संस्थेच्या मागे एक कारण होते. त्यांना दिलेले एक आव्हान होते. आणि ते आव्हान अगदी यशस्वीपणे पूर्ण देखील करवून दाखवले आहे.
- हनुमान मंदिरात उत्सवा निमित्त ‘लवांकुश’ हे नाटक सादर करून या संस्थेने समृद्ध आणि वृद्धिंगत होण्यासाठीची मुहूर्तमेढ रोवली.

- त्यानंतर विश्वनाथ नाईक आणि त्यांचे साथीदार सतत संस्थेसाठी आणि गोमंतकीय रंगभूमीसाठी सदैव कार्यरत होते.
- एकूणच फोंड्यातील नाट्यवर्तुळात विश्वनाथ नाईक ह्याचे आश्वासक नाव झाले.
- 'मत्स्यगंधा', 'रायगडाला जाग येते', 'चक्रव्यूह', 'गणपतवाणी', 'पंडितराज जगन्नाथ', 'राणी लक्ष्मीबाई', 'आज सैरभर सावळ' इत्यादी अनेक नाटके त्यांनी हंस संस्थेच्या माध्यमातून मंचीत केली.
- गोमंतकीय लोकांना गोव्याबाहेरील लोकांना नाट्यप्रेमी म्हणजे काय यांचे उत्तम उदाहरण द्यायचे असेल तर विश्वनाथ नाईक हे उदाहरण फोल ठरणार नाही.
- विश्वनाथ नाईक यांनी 'वेटिंग फॉर गोदो' या नव्या ढंगाच्या नाटकाचे सादरीकरण मुंबईत बघितले, आणि त्यांनी ठरवले की संस्थेचा विकास व्हायचा असेल तर अशा स्वरुपाच्या नाटकांची निर्मिती करणे गरजेचे आहे.
- गोव्यातील नामवंत नाट्यलेखक व दिग्दर्शक किशोर बोरकर यांचा हंस मध्ये प्रवेश घेतला आणि विश्वनाथ नाईक यांनी बोरकरांकडून तीन-चार नव्या पद्धतीची नाटके बसवून घेतली. यामुळेच हंसची दुसरी पिढी नव्या स्वरूपाच्या म्हणजेच प्रायोगिक नाटकांकडे वळली.
- विश्वनाथ नाईक यांच्या दूरदृष्टी मुळेच आजतागायत हंस ही संस्था टिकून आहे.
- विश्वनाथ नाईक ह्यांनी जे केलं ते दुसरी संस्थामध्ये प्रामुख्याने घडत नाही ती गोष्ट म्हणजे हळूवारपणे संस्थेची सूत्र दुसऱ्या पिढीच्या हाती सोपवली.
- विजयकुमार आणि त्यांच्या भावंडांनी पुढील सूत्रे हाती घेतली आणि ती योग्यरितीने सांभाळली.
- हंस ने फक्त गोव्यातच नाही तर गोव्याच्या बाहेर देखील पार दिल्लीपासून हैद्राबादपर्यंत विविध राज्यात नाट्य प्रयोग सादर केले.
- विजयकुमार यांनी १९८८ मध्ये नाटकाचा हात धरला आणि आजपर्यंत कधीच सोडला नाही.
- १९९३ मध्ये 'हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर' या वर्कशॉपच्या माध्यमातून नाटकाशी संबंधित विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रशिक्षणे चालू केली.

- ‘हंस थिएटर’ ही संस्था गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जोपासण्यासाठी सदैव कार्यरत असणारी एक नामवंत संस्था आहे.
- नाटक घरोघरी, शिका १०० मराठी गाणी अश्या वेगळया स्वरूपाच्या संकल्पना सुचवून त्या प्रत्यक्षात लोकांच्या समोर उभ्या करून प्रायोगिक रंगभूमीवर या संस्थेने आपला एक वेगळाच ठसा उमटवलेला आहे.
- या संस्थेने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून गोमंतकात अनेक नाट्य कलाकार घडले. जे आज मोठ्या पडदयावर वावरतांना दिसून येतात.
- अगदी साध्या पद्धतीने आजच्या नवीन मुलांना अनेक विषयां संदर्भात प्रबोधन करण्यासाठी या संस्थेने नाटक आणि अभिनयाचा हात धरलेला दिसून येतो.
- गोव्यातच नव्हे तर गोव्याबाहेर जाऊन नाट्य प्रयोग सादर केलेले आहेत.
- रंगयात्रा आणि बॉक्स थिएटर या सारखे उपक्रम अनोखे व  विशेष अशा स्वरूपाचे होते.
- नाटकात अथवा रंगभूमीवर काहीतरी बदल व सतत नवीन काहीतरी प्रयोग करून प्रायोगिक रंगभूमीचा वारसा जपणे व नाटकांबद्दल आणि मराठी भाषेविषयी एक सकारात्मकता पसरवणे हेच संस्थेचे ध्येय होते आणि आहे हे आपल्याला अशा आयोजित केलेल्या उपक्रमांच्या माध्यमातून दिसून येते.
- गोव्यात व गोव्याबाहेर जाऊन हंस त्या संस्थेने गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमीचे नाव गाजवलेले आहे.
- सततच्या परिश्रमातून आणि प्रयत्नातून गेली अनेक वर्षे नाटकासाठी ही संस्था वावरत आहे.
- विविध विषय लहान मुलांपर्यंत व  महाविद्यालयीन मुलांपर्यंत विविध उपक्रमांतून पोहचवले.
- गोव्यातील विविध गावातील मुले हंस या संस्थेकडे आयुष्यात एकदा तरी परिचयात आलेली आहेत असे म्हंटले तर त्यात  काहीही  चुकीचे ठरणार नाही.
- या संस्थेने फक्त अभिनयच शिकवला नसून नाटकाशी जुळलेले अनेक विषय उदा. नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा इत्यादींचे प्रशिक्षण दिले जाते.
- या संस्थेत वावरणारा प्रत्येकजण पडदा बांधणे, नाटक लिहिणे, दिग्दर्शन करणे, व्यवस्था पाहणे या सगळ्याशी परिचित असतो.

- या संस्थेने कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर भाषिक संस्कार देखील केलेले आहे. त्यामुळे त्यांनी सादर केलेल्या नाटकात वाचाशुद्धी आणि संवाद- स्पष्टता दिसून येते.
- आद्य नाटककारांनी लिहिलेल्या नाटकांचा शोध घेऊन त्यांचा योग्य पद्धतीने अभ्यास करून ती नाटके रंगमंचावर मंचीत या संस्थेने केलेली आहे.
- या संस्थेतील लेखकांनी लेखनात बदल करून, आशय व अभिव्यक्ति यांच्यात प्रायोगिकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.
- एकूणच या संस्थेने प्रायोगिक रंगभूचा हात धरून हंस या संस्थेचे नाव वृद्धिंगत केलेले आहे.
- मुलांना सतत प्रोत्साहन आणि पाठींबा या संस्थेने दिलेला आहे.
- हौशी संगीत रंगभूमी पासून सुरु झालेला हंस चा प्रवास मजल दरमजल करता करता प्रायोगिक, व्यावसायिक आणि थोड्या विस्तारित रुपात आज अकॅडेमिक नाट्यसास्थेपर्यंत पोचलेला आहे.
- विश्वनाथ नाईक यांच्या पासून चालू झालेली संस्था आज या संस्थेची तिसरी पिढी तितक्याच उस्फुर्ततेने चालवत आहे.
- गोमंतकीय मराठी रंगभूमीचा वारसा जपणारं कुटुंब म्हणजे विश्वनाथ नाईक यांचे कुटुंब होय.
- गोमंतकीय प्रायोगिक रंगभूमीला समृद्ध करण्याचे काम सातत्याने या संस्थेने केलेले आहे.
- गोमंतकात प्रायोगिक नाट्यचळवळ चालवण्यात विजयकुमार नाईक यांचा मोठा वाटा आहे.
- मंदार जोग, बिपीन मंगेशकर, नितीन कोलवेकर, एकनाथ नाईक, अजित कामात असे गोमंतकीय कोंकणी आणि मराठी रंगभूमीवर आपली छाप पाडणारे कलाकार 'हंस'च्या तालमीत घडले.
- आता फक्त देशातच नाही तर तिसऱ्या पिढीच्या माध्यमातून हंस या संस्थेचे कार्य आणि कार्यकर्ते देशाबाहेर देखील पोहचलेले आहेत. व स्वतःचा व हंस या नात्यसंस्थेचा नाट्यक्षेत्रात शिक्का उमटवण्यासाठी सज्ज झालेले आहे.
- एकंदरीत विश्वनाथ नाईक यांनी सुरु केलेली संस्था आणि त्यांनी चालू केलेल्या प्रायोगिक रंगभूमीचा वारसा आजतागायत सुरु आहे. आणि एकंदरीत त्यांचा नवनवीन उपक्रमांच्या माध्यमातून असे दिसून येते की याही पुढे तो चालूच राहील आणि अजून वृद्धिंगत होईल.

# • संदर्भ

# • मराठी


- मराठी संगीत रंगभूमीची वाटचाल( श्रीपाद लाटकर)
- मराठी नाटक आणि डॉक्टर प्रतिमा (मधुरा कोराले)
- भारतीय नाट्यप्रयोगविज्ञान ( प्रा. अ. म.जोशी)
- साठोत्तरी मराठी नाटक आणि दलित नाटक (प्रा.डॉ. महावीर विठ्ठल कांबळे)
- नाटक या साहित्यप्रकाराचा सैद्धांतिक परिचय (PDF)
- नाट्यस्वगत स्वरूप आणि समीक्षा (डॉ.सौ. शकुंतला खोत ) १९७७.
- डॉ. देशपांडे वि.भा. मराठी नाटक आणि रंगभूमी.
- श्री. सावंत कृ. रा. – रंग्चार्या, मेजेस्टिक प्रकाशन, गिरगाव, मुंबई. नोव्हे.१९८४.
- डॉ. देशमुख अनंत – नाट्यविचार, निहार प्रकाशन, पुणे -२, नोव्हे. १९८८.
- श्रीमती केतकर गोदावरी – भरतमुनीचे नाट्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट- १९६३.
- डॉ. देशपांडे वि.भा. – नाट्य
- कोश , निशांत प्रकाशन, मे २००६.
- सरदेसाई माया – मराठी रंगभूमीचा उषकाल, बालप्रकाशन, हैद्राबाद १९७०.



## • इंग्रजी:


- Brockett Oscar G.- The Theatre, Holt Rinehart and Winston – 1969.
- Gupta G.N. – Guide to Stage Lighting, Panls Press, New Delhi- 1986

## ● परिशिष्टये

**एकूणच संशोधन करते वेळी काही छायाचित्रे माझ्या हाती लागली त्यांचे संकलन इथे केलेले आहे.**

- **आद्य गोमंतकीय नाटककार कृष्णंभट्ट बांदकर यांच्या अहल्योत्धार या नाटकाचे संकलन.**



- **आद्य गोमंतकीय नाटककार कृष्णंभट्ट बांदकर यांच्या अहल्योत्धार या नाटकाच्या सुरुवात**

"श्रीराम समर्थ"

अथअहल्योत्धारनाटक

श्रीसमर्थ रामदास वैष्णव सद्गुरूपदारवीदेभ्योनमः श्रीरा.

हरिदास : करूनी वंदन त्या रघुनायका, वदतसे सुकथामृत आयका। सुरपतिसतीगौतमसगंमी रडतसे फिरतो स्थिरजंधमे

कारण हेची वदाया परललना पुरूषके काळसुरी मानवत गेले कैसे यत्न करूनि व्यर्थ बहतकाळ सुरी.

कनक लतिकां विधिसूता गौतमा धृमावरी वामहंकी पाहीली सभे त्या शचिवरी विवाधानेदाटला म्हणे काय हे विधिपरी सुप्रयाणेसी ले मला कास या तरी.

बोलोनि ऐसे अमरपतीमती फांश जसातो गेला गौतमललना सुरतसुखांचा ध्यास मनी अतिकेला अष्टही भोग विवर्जित झाले अमृतचविना तोंडी जागृत स्वप्नसुपूर्तीमाजी ऋषिपत्नीची वोढी.

लागले असे वेढ त्याहरी पाहणे पुढे नाटकीपदी श्रोतेया प्रती हेची प्रार्थना आणी जे कथा साध

- **पुस्तकांचे मुखपृष्ठ**

**१.**




**२.**



- **अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुरस्कार प्रदान सोहळा.**


**हंस संगीत नाट्य मंडळाला 'अव्याहत' ह्या नाटकासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे दिला जाणारा उत्कृष्ट नाटकासाठीचा (हौशी विभाग) बापूराव पेंढारकर स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला.**



- **रोहन नाईक  ह्यांना 'अव्याहत' ह्या नाटकासाठी उत्कृष्ट दिग्दर्शनाचा गोपीनाथ सावकार व रमेश चौधरी मित्रमंडळ स्मृती पुरस्कार प्रदान करण्यातआला.**



- **'अव्याहत' नाटकातील छायांकित केलेली छायाचित्रे.**



- कला अकादमीच्या 'अ' गट नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट नाट्यप्रयोगाचं द्वितीय पारितोषिक गोवा राज्याचे वित्त सचिव दौलत हवालदार यांच्याहस्ते स्वीकारताना रवींद्र विश्वनाथ नाईक, किरण नाईक व कौस्तुभ नाईक. ह्या सोहळ्याला ज्येष्ठ अभिनेत्री उत्तरा बावकर, दैनिक हेराल्डचे संपादक राजेंद्र देसाई, व नाट्यसमीक्षक माधव वझे उपस्थित होते.



- **रंगसमन्वय २०१५ मधील छायाचित्रे.**




**१.**



२.




३.



४.



५.



- **विजयकुमार नाईक व केंक्रे**






- **रंगयात्रा , नाट्यसादरीकरण.**






कै. गुलाब मंगेशकर
रंगमंच


Government of Goa
DIRECTORATE OF
ART & CULTURE
यांच्या

- **अव्याहत या नाटकाची समीक्षणे**








- **कार्यशाळांच्या पत्रिका स्वत: तयार केलेल्या.**



- **जठरानल नाटकासाठी लिहिलेली कवाली.**



गळा कापण्या प्रेमिकांचा, प्रिया चाळवी सुरा
दुःख विसरण्या प्रेमभंगाचे, प्रियकर रिचवी सुरा
कोण श्रेष्ठ त्या दोघांमधुनी सांगा की हो मला
हा सुरा की ती सुरा, हा सुरा की ती सुरा ---- (कोरस)
एक सुरा यकृत जाळी, दुजा चिरतो गळा
जीवन लुटूनी नेती दोन्ही, किमान देती कळा
घोट सुरेचा रिचता पोटी, येई शरीरी जान
वार सुऱ्याचा पडता हृदयी, निघून जाई प्राण.
हो सुरेशी अथवा सुऱ्याशी, जपून खेळा हो जरा
कोण श्रेष्ठ त्या दोघांमधूनी सांगा की हो मला
राहो मदिरा अन मदिराक्षी सदैव अमुच्या साठी
आणि न येवो वार सुऱ्याचा कधीही जीवन काळी
असाच राहो सुर सच्चा सदैव अमुच्या गळा
ह्या सुरांच्या बरसातीने आनंद देऊ सकळा
ह्या सुरांच्या पूजनाने उभवू आनंदाच्या माळ
सुर श्रेष्ठ त्या दोघांपेक्षा, उमजले हो मला
... ती सुरा, हा सुरा अन ती सुरा ...


- **संचित केलेली छायाचित्रे.**








JET SET




CULTURA


हंस थिएटर ट्रेनिंग सेंटर, फोंडा
आयोजीत
रंगयात्रा-९६

